
रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १८ ◆ अंक २७१
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ सोमवार, २० एप्रिल २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## फटाका कारखान्यात स्फोट; १६ कामगारांचा मृत्यू



**तिरुवनंतपुरम :** तामिळनाडूतील विरुधुनगर जिल्ह्यात कट्टनारपट्टी भागातील एका फटाका निर्मिती कारखान्यात झालेल्या भीषण स्फोटामुळे मोठी दुर्घटना घडली आहे. प्राथमिक माहितीनुसार या दुर्घटनेत आतापर्यंत १६ जणांचे मृतदेह ढिगाऱ्याखालून बाहेर काढण्यात आले असून अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना तातडीने उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. स्फोटाची तीव्रता इतकी प्रचंड होती की आगीने काही वेळातच शेजारील चार युनिट्सना आपल्या कचाट्यात घेतले. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल, पोलीस आणि आपत्ती निवारण पथके घटनास्थळी दाखल होत युद्धपातळीवर बचावकार्य सुरू करण्यात आले आहे. अनेक कामगार अद्यापही मलब्याखाली गाडले गेल्याचे सांगण्यात येत असून मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त होत आहे.

## अंतरंग
एपीएमसी मार्केटमध्ये स्लॅब कोसळून दोघे जखमी/२
होर्डिंगमुळे जीवित व वित्त हानी होण्याची शक्यता/५
कबड्डीत स्वराज्य स्पोर्ट्स, श्रीराम क्रीडा विश्वस्त विजेते/८

# ‘मिसिंग लिंक’वर लवकरच चाचण्या

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे प्रवासात वाहतूक कोंडीवर उपाय म्हणून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या (एमएसआरडीसी) ‘मिसिंग लिंक’ या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाकडे बघितले जात आहे. हा प्रकल्प आता पूर्णत्वाच्या उंबरठ्यावर आहे. १ मे रोजी महाराष्ट्र दिनी तो वाहतुकीसाठी खुला करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे म्हटले जात आहे. या पार्श्वभूमीवर लवकरच या मार्गावर चाचण्या सुरू होतील, असे सांगितले जात आहे.



एक्स्प्रेस वेवरील खंडाळा एक्झिटपासून खोपोलीपर्यंतचा भाग जीवघेण्या वळणांचा आणि तीव्र उताराचा आहे. हाच भाग ‘ब्लॅक स्पॉट’ बनला आहे. अपघात टाळण्यासाठी ‘मिसिंग लिंक’च्या माध्यमातून लोणावळा आणि खंडाळा घाट टाळून थेट बोगदा तयार करण्यात आला आहे. या नवीन मार्गामुळे वळणावळणाच्या घाटातून जाण्याची गरज उरणार नाही. यातच राज्य सरकारने लोकार्पणासाठी वेळ दिल्यानंतर एक मार्गिका सेवेत दाखल केली जाणार आहे.

मिसिंग लिंक म्हणजेच खोपोली-कुसगावदरम्यानच्या १३.३ किमी लांबीच्या नव्या मार्गिकेचे काम जवळपास पूर्ण झाल्याचे म्हटले जात आहे. सध्या प्रकल्पाच्या कामावरून अखेरचा हात फिरविण्यात येत आहे. लवकरच या मार्गिकेवर चाचण्यांना सुरुवात केली जाणार आहे.

मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग २००२मध्ये सेवेत दाखल करण्यात आला होता. आताच्या घडीला सर्वाधिक वर्दळीचा असा हा महामार्ग ठरला असून दररोज ७० हजारांहून अधिक वाहने याचा वापर करतात. हा मार्ग आताच वाहनांना सामावून घेण्यासाठी अपुरा पडत आहे. त्यामुळे येथे वाहतूक कोंडी होत असून अपघातांची भीतीही वाढली आहे. ही बाब लक्षात घेऊन एमएसआरडीसीने या मार्गाचे दहा पदरीकरण करण्यासह मिसिंग लिंक प्रकल्प हाती घेण्याचा निर्णय घेतला. ही मार्गिका सेवेत दाखल झाल्यास एक्स्प्रेस वेवरील घाटाचा वळसा टळणार असून प्रवासाचा ३० मिनिटांचा अवधी वाचेल.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त ७५ अभंगांचे लोकार्पण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

थोर दानशूर व्यक्तिमत्व आणि माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सव वर्षानिमित्त पनवेलमध्ये अप्रचलित रागांवर आधारित ७५ अभंगांचे भव्य लोकार्पण आध्यात्मिक वातावरणात झाले. श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि नादब्रह्म साधना मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमाने पनवेलच्या सांस्कृतिक परंपरेत भर घातली.

पनवेल मार्केट यार्ड येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लोकनेते रामशेठ ठाकूर होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे महाराष्ट्र प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर, महापौर नितीन पाटील, मंडळाचे उपाध्यक्ष अरुणशेठ भगत, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, गुरुवर्य पं. निवृत्तीबुवा चौधरी, नादब्रह्म साधना मंडळाचे अध्यक्ष वसंत पाटील, रायगड भूषण पं. उमेश चौधरी आदी उपस्थित होते.

### भक्ती, संगीत आणि संस्कृतीचा सुरेल मिलाफ

यावेळी अप्रचलित आणि अनवट रागांवर आधारित सादर करण्यात आलेल्या अभंगांनी उपस्थित रसिक मंत्रमुग्ध झाले. शास्त्रीय संगीताची गोडी आणि भक्तीभाव यांचा सुंदर संगम अनुभवायला मिळाल्याने संपूर्ण सभागृह भक्तिरसात न्हाऊन निघाले. मान्यवरांनी आपल्या मनोगतात या उपक्रमाचे कौतुक करत भारतीय शास्त्रीय संगीत परंपरेच्या जतन व संवर्धनासाठी अशा उपक्रमांची गरज अधोरेखित केली. नवोदित कलाकारांना प्रेरणा आणि योग्य दिशा देणारा हा उपक्रम ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

**पैसा, संपत्तीने फुगलेली हजारो माणसे मी बघितली आहेत, मात्र लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडे सर्व असतानाही त्यांचे पाय जमिनीवर आहेत. लोकांची सदैव सेवा करणे आणि लोकांमध्ये मिळून मिसळून राहणे हा त्यांचा स्थायीभाव आहे. त्यामुळे ते फक्त लोकनेतेच नाही, तर लोकसेवकही आहेत.**
**-पं. निवृत्तीबुवा चौधरी, भजनसम्राट**

भजनसम्राट पं. निवृत्तीबुवा चौधरी यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या उपक्रमांतर्गत अभंगांची चित्रफीत सामाजिक माध्यमांवर उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे विद्यार्थी, शिष्यवर्ग आणि संगीत अभ्यासकांना रागांची शास्त्रशुद्ध ओळख होण्यास मोठी मदत होणार आहे. **(पान २ वर..)**

# खारघर येथे रक्तदान महाशिबिर
## आमदार प्रशांत ठाकूर यांनीही दिले योगदान

**खारघर : रामप्रहर वृत्त**

श्री परशुराम जयंतीचे औचित्य साधून खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये रविवारी (दि.१९) भव्य रक्तदान महाशिबिराचे आयोजन करण्यात आले होते. टाटा मेमोरियल हॉस्पिटलच्या सहकार्याने पार पडलेल्या या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या सामाजिक उपक्रमाला भाजपचे प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देत स्वतः रक्तदान करून समाजासमोर आदर्श निर्माण केला. यावेळी त्यांनी रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असून अशा शिबिरांच्या माध्यमातून गरजू रुग्णांना जीवदान मिळण्यास मोठी मदत होते, असे म्हटले.



या शिबिरास महापौर नितीन पाटील, नगरसेवक रामदास शेवाळे, प्रवीण पाटील, सुमित झुंजारराव, रूपेश नागवेकर यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते रक्तदान करणाऱ्या नागरिकांचा प्रमाणपत्र देण्यात आले. या शिबिरातील रक्त कॅन्सरसारख्या गंभीर आजारांशी लढणाऱ्या रुग्णांच्या उपचारासाठी उपयुक्त ठरणार आहे.

### ‘टीसीएस’प्रकरणी आयोगाची नोटीस

**मुंबई :** आघाडीची आयटी कंपनी टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस)च्या नाशिक शाखेबाबत समोर आलेल्या धक्कादायक तक्रारीची राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने गंभीर दखल घेतली आहे. आयोगाने महाराष्ट्राचे पोलीस महासंचालक, नाशिकचे पोलीस आयुक्त, कामगार आयुक्त तसेच टीसीएसच्या व्यवस्थापकीय संचालकांना नोटीस बजावली आहे.

टीसीएसच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना त्यांच्या अंतर्गत ‘पॉश’ समितीची माहिती, मागील तीन वर्षांतील उपक्रम आणि प्राप्त झालेल्या सर्व तक्रारींचा सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

## निवडक

### अरब आणि इस्लामिक देशांकडून इस्रायलच्या ‘त्या’ कृतीचा निषेध

**दोहा :** कतार, सौदी अरेबिया, इजिप्त आणि तुर्कस्तानसह १६ अरब आणि इस्लामिक देशांच्या परराष्ट्रमंत्र्यांनी दोहा येथे एक संयुक्त निवेदन जारी करून सोमालीलँडमध्ये इस्रायलने राजनैतिक प्रतिनिधीच्या नियुक्तीचा तीव्र शब्दांत निषेध केला. इस्रायलचा हा निर्णय सोमालियाच्या संघराज्याच्या सार्वभौमत्व, एकता आणि प्रादेशिक अखंडतेचे थेट उल्लंघन आहे, असे या देशांनी म्हटले आहे.

### श्रीनगर विमानतळावर दोन अमेरिकन नागरिक ताब्यात; सॅटेलाइट फोन जप्त

**श्रीनगर :** जम्मू-काश्मीरच्या श्रीनगर विमानतळावर सुरक्षा तपासणीदरम्यान दोन अमेरिकन नागरिकांच्या बॅगेतून सॅटेलाइट फोन आढळून आल्याने खळबळ उडाली. भारतात सरकारच्या परवानगीशिवाय सॅटेलाइट फोनचा वापर करण्यास बंदी आहे, मात्र अधिकाऱ्यांच्या मते या नागरिकांना अशा फोनवर भारतात बंदी आहे याची माहिती नसावी. तरीही प्रकरण संवेदनशील असल्याने सुरक्षा अधिकाऱ्यांनी तत्काळ या नागरिकांना ताब्यात घेत पुढील चौकशीसाठी पोलिसांकडे देण्यात आले आहे.

# पश्चिम बंगालमध्ये यंदा भाजप सरकार स्थापन करेल -पीएम मोदी

**कोलकाता : वृत्तसंस्था**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची रविवारी (दि.१९) पश्चिम बंगालच्या पुरुलिया जिल्ह्यात सभा पार पडली. या सभेत बोलताना त्यांनी तृणमूल काँग्रेस आणि काँग्रेसवर जोरदार हल्लाबोल केला तसेच पश्चिम बंगालमध्ये विधानसभेच्या निवडणुकीत भाजप प्रचंड बहुमताने विजयी होईल आणि सरकार स्थापन करेल, असा विश्वास व्यक्त केला.



पंतप्रधान मोदी म्हणाले की, मी सहसा निवडणुकीच्या काळात कोणताही अंदाज वर्तवत नाही किंवा निकाल काय येईल यावरही मी काही भाष्य करत नाही. मी अनेक वर्षांपासून निवडणूक लढवतो, पण अंदाज वर्तवण्याच्या अशा गोष्टी मी शक्यता टाळतो, मात्र या निवडणुकीच्या अनुषंगाने जो कोणी मला भेटतो, तो प्रत्येकजण म्हणतो की यावेळी भाजपचे सरकार निश्चित आहे. त्यामुळे सर्वांचे मत मी ऐकल्यावर आणि माझा जेवढा राजकीय अनुभव आहे, त्यावरून मी आज सांगतो, पश्चिम बंगालमध्ये यावळी भाजप प्रचंड बहुमताने सरकार स्थापन करेल.

“केंद्रात भाजपचे सबका साथ सबका विश्वास असणारे सरकार ११ वर्षांपासून सत्तेवर आहे, तर पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसचे क्रूर सरकार १५ वर्षांपासून सत्तेवर आहे. तृणमूल काँग्रेसच्या गैरकारभाराने, भीतीने आणि भ्रष्टाचाराने पश्चिम बंगालमधील प्रत्येक कुटुंबाला भयभीत केले आहे. याच काळात भाजपच्या सुशासनावरील जनतेचा विश्वास अधिक वाढला आहे, असे म्हणत पंतप्रधान मोदींनी ममता बॅनर्जी यांच्यावर जोरदार टीका केली.

माझ्या राजकीय अनुभवावरून मला खात्री आहे की, ४ मेनंतर भाजपचे मुख्यमंत्री पश्चिम बंगालमध्ये शपथ घेतील. मुख्यमंत्री आणि पंतप्रधान दोघेही भाजपचे असल्याने पश्चिम बंगालचा विकास सध्याच्या गतीपेक्षा दुप्पट वेगाने होईल”, असा दावाही पंतप्रधान मोदींनी यावेळी केला.

### भोंदू अशोक खरातच्या पोलीस कोठडीत वाढ

**नाशिक : प्रतिनिधी**

फसवणूक आणि लैंगिक शोषणाचे गंभीर आरोप असलेला भोंदूबाबा अशोक खरात याच्या अडचणीत आणखी वाढ झाली आहे. न्यायालयाने खरातला पाचव्या गुन्ह्यात पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली असून आता २३ एप्रिलपर्यंत तो एसआयटीच्या ताब्यात असणार आहे.

पाचव्या गुन्ह्यामध्ये खरातवर लैंगिक शोषण आणि भोंदूगिरीचे आरोप आहेत. त्याला रविवारी (दि.१९) व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे न्यायालयात हजर करण्यात आले होते. सुनावणीदरम्यान सरकारी वकिलांनी बाजू मांडताना, पीडित महिलेला गुंगीकारक औषधे आणि इतर पदार्थ नेमके कोठून आणून देण्यात आले याचा शोध घेणे आवश्यक आहे तसेच अत्याचाराच्या या घटनांमध्ये खरातला घरातील इतर कोणाचे सहकार्य लाभले होते का याचा तपास करण्यासाठी पाच दिवसांची पोलीस कोठडी मागितली, तर खरातचे वकील सचिन भाटे यांनी त्यास विरोध दर्शवला. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर न्यायालयाने सरकारी पक्षाचा युक्तिवाद ग्राह्य धरत खरातला पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.

# प्रेमभंगातून अलिबागमध्ये युवकाची आत्महत्या

**अलिबाग : प्रतिनिधी**

प्रेमभंगातून आलेल्या नैराश्यामुळे अलिबाग शहरातील एका तरुणाने गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. अक्षय युवराज निकाळे (वय ३०, मूळ नाशिक) असे मृत तरुणाचे नाव आहे.

अलिबागमधील रामनाथ परिसरात राहणाऱ्या अक्षयचे येथील एका मुलीसोबत गेल्या अनेक वर्षांपासून प्रेमसंबंध होते. दोघे एकत्र आयुष्य घालवण्याच्या तयारीत असल्याची चर्चा होती, मात्र काही दिवसांपूर्वी त्या युवतीने अचानक लग्नास नकार दिला. त्यामुळे अक्षय नैराश्येत गेला होता. या धक्क्यातून सावरता न आल्याने त्याने टोकाचा निर्णय घेतल्याचे समोर येत आहे.



नाशिकमधील कार्यक्रम आटोपून परतल्यानंतर अक्षयने रात्री रामनाथ येथील राहत्या घरी दोरीने गळफास घेतला. याबाबत माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी जाऊन मृतदेह ताब्यात घेतला आणि शवविच्छेदनासाठी अलिबाग जिल्हा रुग्णालयात पाठवला. प्रेमभंगाचा आघात सहन न झाल्याने युवकाने जीवन संपवल्याची भावना व्यक्त होत आहे.

या प्रकरणी प्रसाद रमेश गुरव यांनी फिर्याद दिली असून अलिबाग पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे.

# खारघर हिल महापौर मॅरेथॉन प्रोमो रन उत्साहात
## आरोग्यविषयक उपक्रमाला नागरिकांचा उत्तम प्रतिसाद






**खारघर : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या वतीने रविवारी (दि.१९) आयोजित करण्यात आलेल्या खारघर हिल महापौर मॅरेथॉन प्रोमो रनला नागरिकांनी उत्तम प्रतिसाद दिला. या प्रोमो रनचे उद्घाटन भाजप प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते आणि महापौर नितीन पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

नागरिकांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित या धावण्याच्या स्पर्धेत पाच आणि १० किमी गटात तब्बल तीन हजारहून अधिक जण सहभागी झाले होते.

फिट पनवेल, हेल्दी पनवेल या संकल्पनेला बळ देणाऱ्या या उपक्रमावेळी पनवेल महापालिकेच्या उपमहापौर प्रमिला पाटील, सभागृहनेते ॲड. प्रकाश बिनेदार, नगरसेवक प्रवीण पाटील, सुमित झुंजारराव, नरेश ठाकूर, दिनेश खानावकर, मनोज भुजबळ, काका शेळके, मधु पाटील, जिल्हा सचिव ब्रिजेश पटेल, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, रूपेश नागवेकर यांच्यासह लोकप्रतिनिधी, अधिकारी आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. आगामी मुख्य मॅरेथॉनमध्ये ५, १०, २१ आणि ४२ किमी अशा विविध गटांचा समावेश असणार आहे.

# कर्जतमध्ये ग्रामदैवत श्री धापया महाराजांच्या उत्सवाला सुरुवात

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जतकरांचे ग्रामदैवत श्री धापया महाराज यांचा उत्सव रविवारी (दि.१९) अक्षय्य तृतीयेपासून सुरू झाला. यानिमित्ताने महाराजांच्या दर्शनासाठी भाविकांनी सकाळपासून गर्दी केली होती. सायंकाळी धापया महाराजांची पालखी मिरवणूक शहरातून भक्तिभावाने काढण्यात आली.



**आज रंगणार कुस्तीचा आखाडा**

उत्सवात पहाटे सनई वादनाने प्रसन्न वातावरण निर्माण झाले. यानंतर श्रींची पूजा करण्यात आली. मग अक्षय वर्धावे यांनी शास्त्रीय व भक्ती संगीत गायन सादर केले.दिलीप ठाकरे, उदय घोणे यांच्या हस्ते लघुरुद्र करण्यात आला. त्यानंतर नवस फेडण्यासाठी भाविकांची गर्दी होऊ लागली. सायंकाळी अध्यक्ष गणेश शिंदे, महेंद्र चंदन, प्रशांत पाटील, मनोज वरसोलीकर, दत्तात्रेय म्हसे, प्रकाश आणेकर, आदींच्या मार्गदर्शनाखाली ढोल-ताशा, भजनाच्या तालावर श्री धापया महाराजांची पालखी मिरवणूक काढण्यात आली. शहरातील घराघरात सुहासिनींनी धापया महाराजांची आरती केली. सायंकाळी स्थानिक भजनीबुवांच्या चक्रीभजनाचे आयोजन करण्यात आले होते.

दरम्यान, सोमवारी सकाळी ९ वाजल्यापासून शंभर वर्षांहून अधिक परंपरा असलेला कुस्ती आखाडा रंगणार आहे.

# तळा नगरपंचायत, बोरीच्या माळसाठी विकास निधी कमी पडू देणार नाही -उपमुख्यमंत्री शिंदे

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील बोरीचामाळ येथे श्री देवी लक्ष्मीनारायण मंदिराचे लोकार्पण महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे यांचे हस्ते मंत्री भरतशेठ गोगावले यांचे प्रमुख उपस्थित पार पडला आहे.

यावेळी आमदार तुकाराम काते,जिल्हाधिकारी कीसन जावळे, जिल्हा पोलीस अधीक्षक आचल दलाल, संपर्क प्रमुख अनिल नवगणे, जिल्हा प्रमुख प्रमोद घोसाळकर,तालुका प्रमुख प्रद्युम्न ठसाळ, शहर प्रमुख राकेश वडके, लीलाधर खातू आदींसह पक्षाचे पदाधिकारी,ग्रामस्थ, महिला मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते.





सदर प्रसंगी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी श्री देवी लक्ष्मी नारायण मंदिराचे लोकार्पण केल्याचे जाहीर करून अक्षय तृतीयाच्या शुभेच्छा देत पुढे म्हणाले मंदिर आले की पावित्र्य आले,एक मंगलमय वातावरण आले हे पावित्र्य व मांगल्य जपण्याच काम आपलं आहे.या मंदिरामुळे गावाची समृध्दी व विकास झाल्याशिवाय राहणार नाही सर्वांना आरोग्य लाभेल असे म्हणत माझ्याकडे तळा नगरपंचायतच्या पाणी पुरवठा योजनेसाठी वाढीव निधीची मागणी झाली या पाणीपुरवठा योजनेसाठी सहा कोटी रूपये वाढीव निधी देण्याचे आश्वाशीत करत .बोरीचामाळ पाणीपुरवठा योजनेसाठी एक कोटी देण्याचेही आश्वासन देऊन तळा नगरपंचायत व बोरीचामाळच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही.ते पुढे म्हणाले आम्ही लाडकी बहीण योजना सुरू केली ती योजना कधीही बंद पडणार नाही.माझ्या बहिणींसाठी ती सुरूच राहील.आम्ही घेणारे नाहीत तर देणारे आहोत.असाही टोला त्यांनी विरोधकांना लगावला. तळा तालुक्यात शिंदे साहेबांच्या माध्यमातून उद्योगधंदे आणण्यासाठी प्रयत्न करणार आहोत. त्याचबरोबर शिंदे साहेंबांसोबत आहेत ते तरले आहेत.माझ्यावर जी जबाबदारी दिलीत. ती विश्वासाने पार पाडणार, असेही ते म्हणाले.

## शहापाडा धरणाच्या कामाची माजी खासदार धैर्यशील पाटील यांनी केली पाहणी

**पेण : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार तथा भाजप दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील यांनी पेण तालुक्यातील खारेपाटाला पाणीपुरवठा करणाऱ्या शहापाडा धरणाच्या गाळ काढण्याच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी शनिवार (दि. १८) रोजी केली.

या कामामुळे भविष्यातील पाणीटंचाई कमी होण्यास मोठी मदत होणार असून परिसरातील शेतकरी व नागरिकांना दिलासा मिळणार आहे. यापाहणीवेळी धैर्यशील पाटील, यांच्या समवेत जिल्हा परिषद सदस्य प्रभाकर म्हात्रे, उपसभापती संजय डगर, भाजपा युवा मोर्चा पेण तालुका अध्यक्ष स्वप्नील म्हात्रे, मसद सरपंच हरिश्न्द्रभाऊ, कांदळेपाडा सरपंच मुरलीधर भोईर, वाशी सरपंच संदेश ठाकूर, माजी उपसभापती प्रफुल्ल म्हात्रे तसेच जिल्हा युवा मोर्चा सरचिटणीस. गणेश पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

स्थानिकांच्या पाणी समस्येच्या दृष्टीने हे काम अत्यंत महत्त्वाचे असून प्रशासन व स्थानिक प्रतिनिधी यांच्या समन्वयातून हे काम गतीने पूर्ण करण्याचा निर्धार यावेळी त्यांनी व्यक्त केला



# अक्षय्य तृतीयेचा मुहूर्त साधत झोपडपट्टी पुनर्वसनाला गती

**नवी मुंबई : बातमीदार**

अक्षय्य तृतीयेच्या शुभमुहूर्तावर बेलापूर मतदारसंघातील झोपडपट्टी पुनर्वसन प्रक्रियेला वेग देण्याच्या उद्देशाने आमदार मंदा म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली गौरव निवासस्थानी झोपडपट्टी धारकांकडून फाईल संकलन उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाला स्थानिक नागरिक आणि झोपडीधारकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

सदर बैठकीत ॲडव्होकेट संतोष पळसकर यांनी झोपडपट्टी पुनर्वसन योजनेची सविस्तर माहिती देत पात्रता निकष, आवश्यक कागदपत्रे तसेच प्रक्रियेदरम्यान येणाऱ्या अडचणींबाबत मार्गदर्शन केले. या उपक्रमामुळे पुनर्वसन प्रक्रियेला गती मिळणार असून पात्र झोपडीधारकांना अंदाजे ३०० चौ.फुटांचे घर उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

तसेच दि. ०१ जानेवारी २००० पूर्वीचे पात्र रहिवासी झोपडीधारक व व्यावसायिक गाळाधारकांना विनामूल्य सदनिका किंवा गाळा देण्याची तरतूद आहे. याशिवाय दि. ०१ जानेवारी २०११ पूर्वीचे पात्र रहिवासी झोपडीधारकांना सुमारे २.५ लाख रुपये भरून सशुल्क सदनिका मिळण्यास मदत होणार आहे.

बेलापूर मतदारसंघातील झोपडपट्टीधारकांना सुरक्षित, सुसज्ज आणि सन्मानजनक निवास मिळावा, या उद्देशाने हा उपक्रम हाती घेण्यात आल्याचे आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले. या माध्यमातून अनेक कुटुंबांचे घराचे स्वप्न लवकरच साकार होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

पंचशील नगर बेलापूर, टाटा नगर सीबीडी बेलापूर आणि जय दुर्गा माता नगर परिसरातील सुमारे ३०० ते ३५० झोपडीधारकांनी या उपक्रमात कागदपत्रे जमा केली. त्यामुळे येत्या काळात पुनर्वसन प्रक्रियेला अधिक वेग येणार असून झोपडीधारकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या वेळी आमदार मंदा म्हात्रे यांच्यासह ॲडव्होकेट संतोष पळसकर, ज्योती पाटील, प्रवीण भगत, प्रभाकर कांबळे उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचा कला उत्सव

**नवी मुंबई : बातमीदार**

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी आणि सोशियल मीडियाच्या दैनंदिन वापर कमी व्हावा या उद्धेशाने 'नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र. ९३ (सीबीएसई) यांच्या वतीने शाळेच्या परिसरात शनिवार (ता. १८) रोजी 'आर्ट मेला' मोठ्या उत्साहात पार पडला. या उपक्रमाला पालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली.



या आर्ट मेळ्यात विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेचा आणि सर्जनशीलतेचा उत्कृष्ट आविष्कार सादर केला. कागदी पिशव्या तयार करणे, विविध रंगछटांमधून आकर्षक चित्रनिर्मिती, पारंपरिक वारली चित्रकला, तसेच मातीपासून विविध नक्षीदार भांडी तयार करणे अशा अनेक उपक्रमांचे देखणे प्रदर्शन यावेळी मांडण्यात आले होते. प्रत्येक कलाकृतीतून विद्यार्थ्यांची मेहनत, कल्पनाशक्ती आणि कलाप्रेम प्रकर्षाने जाणवत होते.

विशेष म्हणजे, काही विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक संकल्पना लक्षात घेऊन पुनर्वापर करता येणाऱ्या वस्तूंपासून सुंदर कलाकृती साकारल्या होत्या. यामुळे 'कला आणि पर्यावरण' यांचा सुंदर संगम पाहायला मिळाला. पालकांनी विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे मनापासून कौतुक करत त्यांना प्रोत्साहन दिले. या कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी स्वतःच्या कलाकृतींबाबत माहिती देत उपस्थितांशी संवाद साधला. यामुळे त्यांच्या आत्मविश्वासात लक्षणीय वाढ झाली.

# पोलादपूरमध्ये देवाभाऊ रुग्णवाहिकेचे लोकार्पण

**पोलादपूर : प्रतिनिधी**

राज्याचे मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनातून पोलादपूरचे भूमीपुत्र व भाजपचे विधानपरिषदेतील गटनेते आमदार प्रवीण दरेकर यांच्या प्रयत्नाने पोलादपूर तालुक्यातील कोतवाल बुद्रुक येथील काळकाईमाता क्रीडा व सामाजिक संस्थेला देवाभाऊ रूग्णवाहिका प्रदान करण्यात आली. अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर पोलादपूर शहरातील छ.शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळयासमोर राष्ट्रवादी-भाजपच्या प्रमुखांची तसेच काळकाईमाता क्रीडा व सामाजिक संस्थेचे पदाधिकारी व वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर यांच्या उपस्थितीत लोकार्पण करण्यात आले.



याप्रसंगी आमदार प्रवीण दरेकर यांचे निकटवर्ती माजी अध्यक्ष प्रसन्ना पालांडे, विद्यमान अध्यक्ष वैभव चांदे, महाडचे अध्यक्ष महेश शिंदे, युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष दर्पण दरेकर, शहरअध्यक्ष महेश निकम, सुरेंद्र चव्हाण, डॉ.राजेश शिंदे, डॉ.घनश्याम शेठ, डॉ. संजय वि.शेठ, नगरपंचायतीचे विरोधी गटनेते दिलीप भागवत, ॲड.सचिन गायकवाड, जिल्हा महिला आघाडी उपाध्यक्ष तनुजा भागवत, संतोष मोरे, नितीन म.शेठ, भाजप अल्पसंख्यांक नेते मुश्ताक मुजावर, राजेश जांभळेकर, प्रदीप नरे, विजय दरेकर, राजेश सकपाळ, सपना बुटाला, राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित खेडेकर तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी आ.प्रवीणभाऊ दरेकर आणि मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांना कोतवाल बुद्रुकच्या ग्रामस्थांसह पोलादपूर शहरातील समाजधुरिणांकडून धन्यवाद देण्यात आले.



**अलिबाग : अक्षय्य तृतीयेचा मुहूर्त साधून सोने खरेदीची परंपरा आहे. त्यामुळे रविवारी या मुहूर्तावर सोने खरेदीसाठी ग्राहकांनी गर्दी केली होती. अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर चारचाकी व दुचाकी वाहन खरेदीसाठीही गर्दी दिसत होती.** (छाया : जितू शिगवण)

# डॉ. धर्माधिकारी प्रतिष्ठनतर्फे रायगड पोलिसांना ६१५ बॅरिकेड्स आणि १६ ब्रेथ ॲनलायझर

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील वाहतूक व्यवस्थेला अधिक सक्षम करण्यासाठी डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, रेवदंडा यांनी पुन्हा एकदा सामाजिक बांधिलकी जपत मोठे योगदान दिले आहे. प्रतिष्ठानच्यावतीने तब्बल ६१५ बॅरिकेड्स आणि १६ ब्रेथ ॲनलायझर मशिन्स रायगड पोलिसांना सुपूर्द करण्यात आली.

अलिबाग येथील रायगड पोलीस मुख्यालयात आयोजित छोटेखानी कार्यक्रमात प्रतिष्ठानचे विश्वस्त निरुपणकार डॉ.सचिनदादा धर्माधिकारी, उमेशदादा धर्माधिकारी आणि राहुलदादा धर्माधिकारी यांच्या हस्ते हे साहित्य पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्याकडे प्रदान करण्यात आले.रायगड जिल्ह्यात वाढत्या वाहनसंख्येमुळे वाहतूक व्यवस्थापनाचे आव्हान मोठे झाले आहे. अशा परिस्थितीत उपलब्ध करून देण्यात आलेले बॅरिकेड्स विविध ठिकाणी तैनात करून वाहतूक सुरळीत व सुरक्षित ठेवण्यास मोठी मदत होणार आहे. विशेषतः गर्दीच्या ठिकाणी आणि अपघातप्रवण भागांमध्ये याचा प्रभावी उपयोग होणार आहे. प्रदान करण्यात आलेल्या १६ ब्रेथ ॲनलायझर मशिनमुळे मद्यपान करून वाहन चालवणाऱ्यांवर नियंत्रण ठेवणे अधिक सुलभ होणार आहे. यामुळे अपघातांचे प्रमाण कमी होण्यास हातभार लागेल, असा विश्वास पोलीस प्रशासनाने व्यक्त केला आहे.

पान १ वरुन

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त ७५ अभंगांचे लोकार्पण

यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे औक्षण करून त्यांना शतायुषी शुभेच्छा देण्यात आल्या. आपल्या मनोगतात त्यांनी या आध्यात्मिक कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल कौतुक व समाधान व्यक्त करत आयोजकांचे आभार मानले.

भजनसम्राट पं. निवृत्तीबुवा चौधरी यांनी, आजपर्यंत प्रचलित रागांवर आधारित रचना आहेत, पण आता अप्रचलित रागांवर अभंग तयार करण्यात आले असून ते संगीतातील डॉक्टरेट पदवीसाठी उपयुक्त ठरणार आहेत, असे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मच्छिन्द्र पाटील यांनी केले.

# एपीएमसी फळ मार्केटमध्ये स्लॅब कोसळला; कामगार व ग्राहक जखमी

**नवी मुंबई : बातमीदार**

एपीएमसी फळ मार्केटमध्ये शनिवारी गर्दीच्या वेळी एच विंगमधील ६९७ क्रमांकाच्या समोर अचानक स्लॅब कोसळल्याची घटना घडली. या दुर्घटनेत एक कामगार आणि एक ग्राहक जखमी झाले असून बाजारात एकच खळबळ उडाली आहे.

या घटनेत जखमी झालेल्या ग्राहकाच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन त्यांना ५ टाके घालावे लागले आहेत. तसेच कामगाराच्या डोक्यालाही मार लागला असून त्याच्यावरही उपचार सुरू आहेत. दोघांनाही तातडीने उपचारासाठी उपसचिवांच्या मदतीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती मिळत आहे.

सदर ठिकाणी वरच्या पॅसेजवर मोठ्या प्रमाणात कॅरेट ठेवले जातात तसेच कामगारांची वर्दळ असते, मात्र हा पॅसेज पूर्णपणे जीर्ण अवस्थेत असूनही त्याची दुरुस्ती करण्यात आलेली नाही, असा आरोप व्यापाऱ्यांकडून केला जात आहे.

दरम्यान, मार्केट संचालक आणि अभियंत्यांच्या निष्काळजी कारभारामुळेच हा प्रकार घडल्याची चर्चा बाजार आवारात सुरू आहे. विशेष म्हणजे, पुणे येथील पणन संचालकांनी पॅसेज दुरुस्तीसाठी सुमारे दीड वर्षांपूर्वी मंजुरी दिली होती. तरीही प्रत्यक्ष काम का सुरू झाले नाही, याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. कोणत्या ' तांत्रिक' कारणामुळे कारणामुळेच काम रखडले ? असा प्रश्न विचारला जात आहेम यापूर्वीही अशाच प्रकारे स्लॅब कोसळून एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती. त्यामुळे पुन्हा अशी दुर्घटना घडल्याने प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.या घटनेची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

# अचूक व पारदर्शक मतदार यादी व्हावी यासाठी लक्ष ठेवा -उदय सामंत

**कर्जत : प्रतिनिधी**

'कर्जत विधानसभा मतदारसंघात आपल्या हक्काची मते मतदार यादीतून बाहेर जात नाही ना? हे पाहण्याची जबाबदारी आपल्या बूथ एजंटांची आहे. निवडणुकीत यश मिळवण्यासाठी मतदार यादी अधिक अचूक पारदर्शक आणि अद्ययावत असणे अत्यंत आवश्यक आहे. प्रत्येक पात्र नागरिकाचा समावेश यादीत होईल याची खात्री बूथ एजंट यांनी करायला हवी. तसेच मतदार यादीतील अपूर्ण चुकीच्या किंवा बोगस नोंदी वगळण्यासाठी कार्यकर्त्यांनी सातत्याने पाठपुरावा करावा. आपले म्हणणे योग्य असेल पण शासनाचा बी एल ओ ऐकून घेत नसेल तर आम्हाला सांगा.' असे महत्वपूर्ण आश्वासन राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी दिले.



राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यात बूथ लेव्हल एजंट यांचा आढावा बैठका सुरू आहेत. कर्जत येथील शिवतीर्थ पोसरी येथे कर्जत विधानसभा मतदारसंघाची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. याप्रसंगी आमदार महेंद्र थोरवे, शिवसेना संपर्क प्रमुख विजय पाटील, जिल्हाप्रमुख संतोष भोईर, उरण जिल्हा प्रमुख विनोद साबळे, जिल्हा संघटक संभाजी जगताप, विधानसभा संघटक शिवराम बदे, उपसभापती भाई शिंदे, माथेरान नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी, युवा सेना जिल्हा प्रमुख प्रसाद थोरवे, तालुका प्रमुख संदेश पाटील, युवासेना तालुका प्रमुख अमर मिसाळ, मनोज खेडकर आदी उपस्थिती होते.

या बैठकीत बोलताना उद्योग मंत्री उदय सामंत यांनी आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संघटनात्मक तयारीचा आढावा घेतला. प्रत्येक मतदान केंद्रावर दक्ष आणि प्रशिक्षित बीएलए नियुक्त करून बूथ स्तरावर संघटना मजबूत करण्याच्या सूचना देण्यात आल्या. बीएलओ आणि बीएलए यांच्यात उत्तम समन्वय राखण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले. शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांची माहिती तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचवून शिवसेनेचे कार्य प्रभावीपणे मांडण्याचे आवाहनही त्यांनी कार्यकर्त्यांना केले.

पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी संवाद साधताना उदय सामंत यांनी स्थानिक विकासाच्या गरजा आणि नागरिकांच्या अपेक्षा जाणून घेतल्या. बुथ स्तरावरील कार्यकर्त्यांना बळकट करणे, हेच आगामी विजयाचे सूत्र असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

# अनधिकृत होर्डिंगवर सिडकोची कारवाई



**पनवेल : वार्ताहर**

पावसाळ्यात वादळी वाऱ्यांमुळे अवाढव्य जाहिरात होर्डिंग कोसळण्याचे प्रकार घडू नयेत यासाठी सिडकोने अनधिकृत होर्डिंग विरोधात कठोर भूमिका घेत, सदरचे होर्डीग जमीनदोस्त करण्याची कारवाई हाती घेतली. त्यामुळे अनधिकृतपणे होर्डींग उभारुन बेकायदेशीररित्या जाहिरातबाजी करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

सिडकोच्या हद्दीत नैनासह इतर भागामध्ये सिडकोच्या नियमावलीचे उल्लंघन करुन तसेच कोणतीही अधिकृत परवानगी न घेता अनेक ठिकाणी अवाढव्य असे जाहिरात होर्डीग उभारण्यात आले आहेत. सदरचे होर्डीग महामार्गालगत असल्याने वादळी वाऱ्याच्या काळात ते अपघाताला कारणीभूत ठरु शकतात. सदरचा धोका ओळखून सिडकोच्या अनधिकृत बांधकामे (नैना) विभागामार्फत विनापरवाना उभारण्यात आलेले अवाढव्य जाहिरात फलक हटविण्याची कारवाई करण्यात आली. मुंबई-राष्ट्रीय महामार्गालगत पनवेल पळस्पे येथील खंडोबा हॉटेलसमोर तसेच अरिहंत बिल्डिंग जवळ उभारलेल्या अनधिकृत जाहिरात फलकधारकांना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन-नगररचना अधिनियम, १९६६ अंतर्गत नोटिसा बजावण्यात आल्या होत्या, मात्र संबंधितांनी फलक न काढल्याने अखेर 'सिडको' ने निष्कासन मोहीम राबवत सदर फलक हटवले.

सदर कारवाई मुख्य दक्षता अधिकारी तथा पोलीस उपमहानिरीक्षक सुरेश मेंगडे यांच्या निर्देशानुसार आणि मुख्य नियंत्रक (अनधिकृत बांधकामे-नैना) प्रशांत भांगरे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या मोहिमेत अतिक्रमण विभागाचे दत्तात्रय चौरे, जितेंद्र परदेशी, भूमापक शिवराज चव्हाण, स्थानिक पोलीस, सिडको पोलीस पथक, महावितरण अधिकारी, सिडको सुरक्षा रक्षक तसेच महाराष्ट्र सुरक्षा मंडळाच्या कर्मचाऱ्यांचा सहभाग होता.

## दोन अपघातात दोन जणांचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलमध्ये झालेल्या दोन वेगवेगळ्या भीषण रस्ते अपघातात दोघांचा मृत्यू झाला असून दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. एका अपघातात भरधाव दुचाकी रस्ता दुभाजकावर धडकून तरुणाचा मृत्यू झाला आहे. तर पाईप घेऊन जाणाऱ्या टेम्पोला पाठीमागून ट्रकने धडक दिल्याने टेम्पोतील क्लिनरचा मृत्यू झाला आहे. या दोन्ही अपघाताप्रकरणी पनवेल शहर आणि पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पहिली घटना पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत एनएच ०४ बी रोडवर करंजाडे सबवे समोर घडली. मुंबईतील चांदिवली येथील संघर्ष नगर येथे राहणारा आर्यन शंकर बेंद्रे (१९), दिपेश गोवळकर (१९) या मित्रासह दुचाकीवरुन (एमएच-०३ एफए ७८७४) मुंबईहुन पुण्याच्या दिशेने जात होता. त्यांची दुचाकी पनवेल मधील करंजाडे सबवे समोर आली असताना, भरधाव वेगात असलेल्या दुचाकीवरील आर्यनचे नियंत्रण सुटले. त्यामुळे त्याची दुचाकी रस्त्याच्या मधोमध असलेल्या रस्ता दुभाजकारवर धडकली. या अपघतात आर्यन आणि त्याचा मित्र दिपेश दोघेही गंभीर जखमी झाले, दोघांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, त्यापूर्वीच आर्यनचा मृत्यू झाला. आर्यन याने बेदरकारपणे दुचाकी चालवून नेल्यामुळे सदरचा अपघात घडल्याचे आढळून आल्याने पनवेल शहर पोलिसांनी त्याच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

तर दुसरी घटना पनवेल तालुका हद्दीत मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवर पळस्पे महामार्ग पोलीस चौकीजवळ पहाटे ५ च्या सुमारास घडली. सिमेंटचे पाईप घेऊन जाणारा टेम्पो (एमएच १२ टीव्ही ६३४५) पुण्याकडे जात असताना, मागून आलेल्या भरधाव ट्रकने (एमएच ४६ सीएल ९४६७) टेम्पोला जोरात धडक दिली. सदर धडक इतकी भीषण होती की टेम्पो चालकाचे नियंत्रण सुटून टेम्पो लोखंडी रेलिंगला जाऊन धडकला. या अपघातात टेम्पोमधील हमाल (क्लिनर) पंढरीनाथ राम रेड्डी (५९) गंभीर जखमी झाले. त्यांना उपजिल्हा रुग्णालय पनवेल येथे दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. टेम्पो चालक जालिंदर शिवशरण (४००) देखील या अपघातात जखमी झाला असून त्याच्यावर कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

## फासकीत अडकलेल्या वाघाटी जातीच्या दुर्मिळ रानमांजराला जीवदान



**उरण : बातमीदार**

धुतूम गावचे सामाजिक कार्यकर्ते शरद धावजी ठाकूर हे सकाळी वॉकिंगसाठी जात असतानां त्यांना रस्त्याच्या कडेला काहीतरी हालचाल होतांना दिसली. धुतूम हद्दीत कुण्या अज्ञात इसमाने लावलेल्या फासकीत ( फासात ) वाघाटी ( Rusty spotted cat) जातीची रानमांजर अडकलेल्या अवस्थेत शरद ठाकूर यांना पाहायला मिळाली लागलीच त्यांनी केअर ऑफ नेचर सामाजिक संस्थेचे संस्थापक आणि प्राणीमित्र महाराष्ट्र भूषण राजू मुंबईकर व प्रविण कडू यांना ह्या गोष्टीची माहिती देऊन कळविण्यात आले. ही माहिती मिळताच लागलीच राजू मुंबईकर यांच्या सोबत केअर ऑफ नेचर संस्थेची टीम घटनास्थळी जावून जागेची पाहणी करून लागलीच त्या फासकी ( फासा) मधून त्या वाघाटी जातीच्या रानमांजराची अगदी सुखरूपपणे सुटका करून तिला एका लोखंडी पिंजऱ्यात आणून लागलीच राजू मुंबईकर यांच्या माध्यमातून महाराष्ट्र वनविभाग उरण वनपरिक्षेत्राचे वनपाल सुनिल महाडिक यांना कळविण्यात आले व त्या वाघाटी जातीच्या रानमांजराला कुठलीच इजा झाली नसल्या कारणामुळे तिला मौजे वेश्वी - उरण येथील जंगलात वनगार्ड राजेंद्र करांडे यांच्या समक्ष त्यांच्या अधिवासात मुक्त संचार कारणासाठी सुखरूपपणे मुक्त करण्यात आली.

अत्यंत लाजाळू आणि निशाचर असणारी प्रजाती ( Rusty spotted cat )मराठीत हीला वाघाटी म्हणतात. जगातील आकाराने सर्वात लहान असणारी मांजर (रानमांजर) इंग्रजी नावाप्रमाणेच तीचं शरीर एखाद्या गंज लागलेल्या धातूच्या रंगाप्रमाणे असते ह्या रंगामुळेच ती आपल्या अधिवासात बेमालूमपणे मिसळून जाते. निशाचर आणि त्यात अत्यंत लाजाळू असल्यामुळे वाघाटीचे दर्शन सहजपणे होत नाही त्यामुळेच ही मांजर दुर्मिळ प्रजातीची मानली जातोय.

वाघाटी जातीच्या रानमांजराला वाचण्यासाठी उरण -धुतूम गावातील सामाजिक कार्यकर्ते शरद ठाकूर , निकेश मढवी, कपिल घरत, प्रतिक ठाकूर, देवेंद्र ठाकूर आणि धुतूम गावातील ग्रामस्थ सोबतच केअर ऑफ नेचर सामाजिक संस्थेचे संस्थापक राजू मुंबईकर,प्रविण कडू आणि कॉन संस्थेचे टीम यांनी विशेष मेहनत घेतली. या सर्वांच्या प्रयत्नातून वाघाटी जातीच्या ह्या दुर्मिळ रानमांजराची सुखरूपपणे सुटका करून तीला तीच्या मुक्त अधिवासात ( जंगलात ) मुक्त संचार करण्यासाठी मुक्त केल्याने ह्या सर्वांचे सर्व स्तरांतून कौतुक केले जात आहे.

## गेम खेळताना आई रागावल्याने सोडले घर

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

गेम खेळणाऱ्या पंधरा वर्षीय मुलावर आई रागावल्याने त्याने घर सोडल्याची घटना सुकापुर येथे घडली. या प्रकरणी अनोळखी इसमाविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात १७ एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.संतोष कुमार मोरया हे सावन नगरी, सुकापुर येथे राहत असून त्यांचा पंधरा वर्षीय मुलगा मोबाईलवर सारखा गेम खेळतो. त्याची आई त्याच्यावर रागावली असता त्याने घरातून काहीही न सांगता तो निघून गेला. अनोळखी इसमाने त्याला पळवून नेल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला.



**पनवेल : येथील महापालिकेच्या नगरसेविका दर्शना भोईर यांचा वाढदिवस रविवारी मोठ्या उत्साहात साजरा झाला. यानिमित्त त्यांना माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पुष्पगुच्छ देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी पनवेल पंचायत समितीच्या माजी सदस्य रत्नप्रभा घरत, नगरसेवक शशिकांत शेळके, नगरसेविका प्रतिभा भोईर, सचिन पाटील, लीना पाटील, सपना पाटील, नीता मंजुळे, सुवर्ण मार्गी, कविता पाटील, सोनल महाडिक, वैशाली पाटील यांनीही दर्शना भोईर यांचे अभीष्टचिंतन केले.**

## आसूडगाव येथून तरुणी बेपत्ता

**पनवेल :** खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीतून १९ वर्षीय तरुणी बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात मिसिंगची नोंद करण्यात आली आहे.निधी रुदल गौंड (वय १९ वर्षे) ही तरुणी आसुडगाव परिसरातून बेपत्ता झाली आहे. ती घरातून बाहेर फिरण्यासाठी गेल्यानंतर परत न आल्याने कुटुंबीयांनी शोध घेतला, मात्र ती सापडली नाही. या प्रकरणी तिची आई सौ. इंद्रावती रुदल गौंड यांनी खांदेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. सदर मुलीची उंची सुमारे ४.५ फूट, रंग गोरा, अंगाने सडपातळ, नाक सरळ, डोळे काळे, केस लांब व काळे, चेहरा उभट. ती अंगात पांढऱ्या रंगाची फ्रॉक परिधान केलेली होती. ती हिंदी व भोजपुरी भाषा बोलते. या प्रकरणाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक पांडुरंग घागरे करीत आहेत



## विजया चामे यांचे रस्ता सुरक्षादूत म्हणून कौतुकास्पद कार्य

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्रीमती विजया चामे यांनी आपल्या कर्तव्यकाळात प्रशासकीय जबाबदारी सक्षमपणे पार पाडली व त्यासोबतच माणुसकीच्या नात्याने आणि रस्ता सुरक्षा दूत म्हणून अत्यंत कौतुकास्पद कार्य केले आहे. आपत्कालीन परिस्थितीत तत्परता (जीवनरक्षक कार्य): जानेवारी २०२५: भरारी पथकात कर्तव्य बजावत असताना, एका भीषण अपघातातील जखमी मुलाला कोणतीही वेळ न घालवता कार्यालयाच्या शासकीय वाहनातून तात्काळ एमजीएम (MGM) हॉस्पिटलमध्ये दाखल केले व उपचार सुरू होईपर्यंत पाठपुरावा केला. मे २०२५: मुंबई-पुणे एक्सप्रेस-वे वर रात्रीच्या वेळी भरारी पथकाचे काम करत असताना, एका अपघातग्रस्त टेम्पो चालकाला ॲम्बुलन्सच्या साहाय्याने एमजीएम हॉस्पिटलमध्ये वेळेत दाखल करून त्याचे प्राण वाचवण्यास मदत केली.

रस्ता सुरक्षा बाबत जनजागृती: रस्ता सुरक्षा बाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने त्यांनी विविध कंपन्या, शाळा, महाविद्यालये आणि निवासी वसाहतींना भेटी दिल्या. तेथे नागरिकांना वाहतुकीच्या नियमांचे महत्त्व पटवून देऊन रस्ता सुरक्षेबाबत प्रभावी मार्गदर्शन केले व अपघात कमी होण्याचे दृष्टीने विशेष प्रयत्न केले.

महिला सक्षमीकरण: जानेवारी महिन्यात त्यांनी २५० हून अधिक दुचाकी, चारचाकी आणि रिक्षा चालक महिलांची रस्ता सुरक्षा रॅली' यशस्वीपणे आयोजित केली. या उपक्रमाद्वारे महिला चालकांचा कार्यालयामार्फत गौरव करून त्यांना प्रोत्साहित करण्यात आले.

विजया चामे यांचे उल्लेखनीय कार्याचेच फलीत म्हणून परिवहन विभागाच्या वर्धापनदिनी आयोजीत सोहळयात दि. ०१.०३.२०२६ रोजी मा.ना.परिवहन मंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याहस्ते प्रशस्तीपत्र व मानचिन्ह देऊन त्यांचा गुणगौरव करण्यात आला. ही बाब प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल संपूर्ण विभागासाठी अभिमानास्पद आहे.



## आदई हिलवर हरित क्रांती; नागरिकांच्या वर्गणीतून कायमस्वरूपी बंधाऱ्यांची उभारणी

**पनवेल : वार्ताहर**

पर्यावरण संवर्धनाच्या उद्देशाने आदई हिल येथे सुरू झालेल्या वृक्षारोपण मोहिमेला स्थानिक नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळत असून गेल्या काही वर्षात या उपक्रमाने हरित चळवळीचे रूप धारण केले आहे. मेजर किसन चोराटे व त्यांच्या बिल्डिंगमधील सहकाऱ्यांनी २०१३ साली या मोहिमेची सुरुवात केली होती.



कोरोना काळात या उपक्रमाला अधिक बळ मिळाले, पनवेल ट्रेकर्स, हिरवाई ग्रुप, आगरी कोळी डॉक्टर्स ग्रुप, संवेदना चॅरिटेबल ट्रस्ट यांसारख्या विविध सामाजिक संस्थांनी यात सक्रिय सहभाग नोंदवला. परिणामी, आजपर्यंत १० हजारांहून अधिक झाडे लावण्यात यश आले आहे. वृक्षांना पाणीपुरवठा करण्यासाठी पूर्वी मातीचे बंधारे बांधले जात होते; मात्र ते पावसाळ्यात वाहून जात असल्याने कायमस्वरूपी उपायाची गरज भासू लागली. यासाठी अरुण रोकडे, नितीन वाघमारे आणि संतोष टकले यांनी पुढाकार घेत दोन सिमेंट कॉंक्रिटचे मजबूत बंधारे उभारले. या कामासाठी नागरिकांनी लोकवर्गणी जमा करून सुमारे ३.७५ लाख रुपये खर्च केला. या उपक्रमात उत्तम ढेबे, लक्ष्मण तळेकर, श्री हातिसकर, मनोज म्हात्रे, रवि शेळके, हरिश शेळके, ॲड. नागेश हिरवे, रविंद्र गोविंद यांसह अनेक सहकाऱ्यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून मोलाचे योगदान दिले. तसेच आदई गावातील ग्रामस्थांचेही विशेष सहकार्य लाभले. ग्रामपंचायतीतर्फे ५०० किलो स्टील व सेंट्रिग साहित्य उपलब्ध करून देण्यात आले.

## शिर्डी साईबाबा मंदिराच्या सीईओंची पनवेलच्या साईबाबा मंदिराला भेट

**पनवेल : वार्ताहर**

शिर्डी साईबाबा मंदिराचे मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) गोरक्ष गाडीलकर यांनी पनवेलच्या श्री साईबाबा मंदिराला भेट दिली. यावेळी त्यांनी सद्गुरु श्री साई नारायण बाबा आश्रम, श्री भगवती साई संस्थान पनवेलच्या श्री.साईबाबा मंदिराची पाहणी केली. मंदिरातील श्री साईबाबा आणि नारायण बाबा यांचे दर्शन घेतले.यावेळी त्यांनी बोलताना,आपण सर्वजण एकाच परिवारातील आहोत.श्री साईबाबा यांचे कार्य आपण पुढे घेऊन चालत आहोत.तुम्ही कोणतीही सेवा करा, पण ती श्रद्धापूर्वक केली पाहिजे. शिर्डी येथे जगातल्या कानाकोपऱ्यातून साईभक्त दर्शनासाठी येतात.श्री साईबाबांची जे भक्त सेवा आणि भक्ती करतात, त्यांना निश्चितच आशीर्वाद मिळतो.मंदिराच्या एकूण कामकाजाबद्दल त्यांनी खूप समाधान व्यक्त केले. मंदिराच्यावतीने कोऑर्डिनेटर राम थदानी यांनी गाडीलकर यांच्यासह त्यांच्या कुटुंबीयांचे स्वागत केले.



## खारघरच्या योग संस्थानचा वर्धापन दिन उत्साहात





**खारघर : रामप्रहर वृत्त**

योग संस्थान खारघरच्या व्या वर्धापन दिनानिमित्त खारघरमधील सेक्टर १० येथील सिडको गार्डनमध्ये एका विशेष सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला भाजपचे प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्रमुख उपस्थिती लावून संस्थेच्या गेल्या दशकभराच्या यशस्वी वाटचालीचा आणि कार्याचा गौरव केला. योगाच्या माध्यमातून समाजात निरामय आरोग्य, मानसिक शांतता आणि सकारात्मकता पसरवण्याचे अत्यंत मोलाचे कार्य योग संस्थान सातत्याने करत असल्याची दखल यावेळी आमदार ठाकूर व उपस्थित मान्यवरांनी घेतली. या सोहळ्याप्रसंगी पनवेल तालुका उत्तर मंडळ अध्यक्ष तथा नगरसेवक दिनेश खानावकर, नगरसेवक शत्रुघ्न काकडे यांच्यासह परिसरातील इतर मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मान्यवरांनी आपल्या मनोगतातून संस्थेच्या उत्कृष्ट उपक्रमांचे कौतुक करत त्यांना पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. आरोग्यदायी जीवनशैलीचा प्रसार करणाऱ्या या कार्यक्रमात स्थानिक नागरिकांनीही मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला होता.

## संपादकीय

# ऐतिहासिक संधी गमावली

भारतीय लोकशाहीत महिलांच्या प्रतिनिधित्वाचा प्रश्न अनेक दशकांपासून प्रलंबित आहे. या पार्श्वभूमीवर नारी शक्ती वंदन अधिनियम (१३१वी घटनादुरुस्ती) विधेयक सादर करून केंद्र सरकारने एक ऐतिहासिक पाऊल उचलले होते, मात्र लोकसभेत हे विधेयक नामंजूर होणे ही केवळ संसदीय प्रक्रिया नसून महिलांच्या सक्षमीकरणाच्या दिशेने उचललेले एक महत्त्वाचे पाऊल विरोधी पक्षांच्या विरोधामुळे रोखले गेले आहे.

**घटनादुरुस्तीच्या विशेष बहुमताची अट पूर्ण न झाल्याने विधेयक मंजूर होऊ शकले नाही. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी निकाल जाहीर केल्यानंतर सत्ताधारी पक्षाने यावर तीव्र नाराजी व्यक्त केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने महिलांना केवळ सामाजिकच नव्हे, तर राजकीयदृष्ट्याही सशक्त करण्याचा ठाम निर्धार या विधेयकातून दाखवून दिला होता. महिलांना संसद आणि विधानसभांमध्ये ३३ टक्के आरक्षण देण्याचा प्रस्ताव हा भारताच्या लोकशाहीला अधिक समतोल आणि प्रतिनिधिक बनवण्याच्या दिशेने महत्त्वाचा टप्पा ठरला असता. सरकारने केवळ एकच विधेयक न मांडता त्यास पूरक अशी तीन विधेयके सादर केली. संविधान दुरुस्ती, परिसीमन प्रक्रिया आणि केंद्रशासित प्रदेशांपर्यंत आरक्षणाचा विस्तार या सर्व बाबींचा समन्वय साधून एक व्यापक आराखडा तयार करण्यात आला होता. ही केवळ राजकीय घोषणा नव्हती, तर एक नियोजनबद्ध सुधारणा प्रक्रिया होती. विरोधकांनी या विधेयकाला विरोध करताना परिसीमन, सामाजिक समतोल आणि तांत्रिक अडचणींचा मुद्दा उपस्थित केला, मात्र या आक्षेपांमुळे महिलांच्या प्रतिनिधित्वाचा मूलभूत प्रश्न मागे पडल्याचे दिसून आले. काँग्रेस, डीएमके, समाजवादी पक्ष, तृणमूल काँग्रेस यांसारख्या पक्षांनी तत्त्वतः समर्थन दर्शवले असले तरी निर्णायक क्षणी त्यांनी घेतलेली भूमिका या ऐतिहासिक संधीला अडथळा ठरली. परिसीमनाबाबत निर्माण केलेली भीती ही अनेकांच्या मते अतिशयोक्त आणि राजकीय स्वरूपाची होती. सरकारने सुरुवातीपासूनच आपली भूमिका स्पष्ट केली होती, तरीही विरोधकांनी जनतेमध्ये संभ्रम निर्माण केल्याचा आरोप सत्ताधाऱ्यांनी केला. विधेयक नामंजूर झाल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला संबोधित करत विरोधकांवर तीव्र टीका केली. त्यांनी या कृतीला महिलांच्या सक्षमीकरणाविरोधातील पाऊल ठरवले. 'महिला आरक्षणाच्या प्रयत्नांची भ्रूणहत्या' असा उल्लेख करत त्यांनी विरोधकांच्या भूमिकेवर कठोर शब्दांत टीका केली. पंतप्रधानांनी स्पष्ट केले की, सरकारने प्रामाणिकपणे महिलांना राजकीय शक्ती देण्याचा प्रयत्न केला, मात्र काही पक्षांनी तांत्रिक कारणांच्या आडून या प्रक्रियेला अडथळा आणला. त्यांनी जनतेला आवाहन केले की, अशा भूमिकेचे राजकीय परिणाम भविष्यात दिसून येतील. या संपूर्ण घटनाक्रमातून एक महत्त्वाचा संदेश स्पष्ट होतो की महिलांच्या सक्षमीकरणाच्या मुद्द्यावर अजूनही राजकीय एकमताची गरज आहे. सरकारने पुढाकार घेतला असला तरी विरोधकांच्या असहकारामुळे हा प्रयत्न अपूर्ण राहिला. महिलांचे प्रतिनिधित्व वाढवणे ही केवळ एक धोरणात्मक बाब नाही, तर ती सामाजिक न्यायाची गरज आहे. भारतासारख्या मोठ्या लोकशाहीत महिलांचा आवाज अधिक प्रभावीपणे ऐकू यावा यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता आहे. विधेयक फेटाळले गेले असले तरी सरकारने महिलांच्या सक्षमीकरणासाठीची आपली वचनबद्धता कायम ठेवली आहे. भविष्यात अधिक संवाद, स्पष्टता आणि सर्वपक्षीय सहकार्याच्या माध्यमातून हा मुद्दा पुन्हा पुढे येण्याची शक्यता आहे. सरकारने दाखवलेली इच्छाशक्ती आणि नियोजनबद्ध दृष्टिकोन लक्षात घेता हा प्रयत्न तात्पुरता अडथळा ठरला असला, तरी अंतिम ध्येय साध्य करण्याची दिशा कायम आहे.**

# ज्ञानपीठ विजेते साहित्यिक गोपीनाथ मोहंती



ओडिशातील सुप्रसिद्ध ओडिया कवी, इंग्रजी भांषातरकार, भारतीय साहित्यातील सर्वोच्च ज्ञानपीठ पुरस्काराचे मानकरी गोपीनाथ मोहंती त्यांचा जन्म २० एप्रिल १९१४ रोजी ओडिशा राज्यातील कोनापूर जिल्ह्यातील नागवली या गावी जमीनदार कुटुंबात झाला. त्यांचे वडील सुर्यनाथ मोहंती अद्भूत व्यक्तिमत्त्वाचे धनी होते, मात्र अतिशय अल्पकाळ गोपीनाथ यांना आपल्या पित्याच्या समवेत राहायला मिळाले.

वयाच्या बाराव्या वर्षी पोरके झालेल्या गोपीनाथ यांचे शिक्षण आपल्या भावाजवळ पाटना येथून झाले. १९३०मध्ये मॅट्रीकच्या परीक्षेत ते दुसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले. १९३६मध्ये कटक विद्यापीठातून इंग्रजी विषयात एम.ए. झाले. १९३८पासून ते ओडिशाच्या प्रशासकीय सेवेत रूजू झाले. विविध पदांवर काम करीत असताना ओडिशाच्या अनेक गावातून त्यांची नियुक्ती झाली. त्यामुळे ओडिशातील ग्रामीण जीवन, आदिवासी जीवनपद्धती, त्यांचे आचार-विचार, त्यांच्या समस्या ते जाणून घेऊ शकले.

वयाच्या २६व्या वर्षी त्यांनी आपल्या साहित्य लेखनाला प्रारंभ केला. त्यांचे १९ कादंबऱ्या, सहा कथासंग्रह, दोन नाटके, एक निबंधसंग्रह, दोन चरित्रे व आदिवासींच्या भाषेसंबंधात आठ पुस्तके आदी त्यांची एकूण ४५ पुस्तके प्रकाशित झाली असून चार हिंदी, बंगाली व इंग्रजीतून अनुवादित आहेत. गोपीनाथ मोहंती यांचे प्रकाशित साहित्य : कादंबरी – मन गहिरर चाष (१९४०), दादी बुद्धा (१९४४), परजा (१९४५),अमृतर संतान (१९४७), दाणापाणी (१९५५), अपहंचा (१९६१), माटीमटाल (१९६४), आकाश सुंदरी (१९७२), मनारा निआन (१९७९), डिगा दिहुडी (१९७९) ; कथासंग्रह – नववधू (१९५२),चाइ अलुआ (१९५६), नंमाने नही (१९६८); संशोधन आणि भाषांतरे – गड्बा भाषा परिचय (१९५६), कुभी कोंढ भाषा तत्त्व (१९५६), सावोरा भाषा (१९७८) याशिवाय त्यांनी भारतीय साहित्यातील थोर साहित्यिकांच्या लोकविख्यात कृतींचा अनुवाद केला आहे.

प्रजा या त्यांच्या कादंबरीचे चाळीस वर्षानंतर फेबर आणि फेबर आणि ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने इंग्रजी भाषांतर झाले. मुख्यत्वे त्यांच्या लेखनात ओडिशा राज्यातील आदिवासी जीवनाच्या विविध छटा व्यक्त होतात. अमृतर संतान या कादंबरी मध्ये अमृततारा संतान या प्राचीन कवीच्या कुवी – कोढ वंशाचे चित्रण आतिशय कुशलतेने करून त्या काळातील अध्ययनावर प्रकाश टाकला आहे. स्वराबू सौधाचे निधन झाल्यानंतर एका नव्या युगाच्या प्रतिकाचा प्रारंभ होतो आणि त्यातून विलक्षण आधुनिकवादातील वंशाच्या आक्रमणाच्या समृद्धीचा उगम आदिवासी जीवनामध्ये कशा प्रकारे होतो हे महाकाव्य या कादंबरीमध्ये गीतात्मक पद्धतीने सांगितले आहे. येथे मोहंती यांच्या लेखनातील कल्पकता दिसून येते. निर्धन, शोषित, पददलित व आदिवासींच्या जीवनाचं चित्रण करणाऱ्या त्यांच्या या साहित्यकृतीमुळे त्यांना प्रसिद्धी मिळाली. आदिवासीतील परजा, कन्ध, कोल्ह, डंब यांच्याबरोबर राहताना ते जमीनदार कुटुंबातील असूनही त्यांच्यात मिसळून गेले. विशेषतः कोराटपूर आणि तेथील आदिवासींशी त्यांचे अतूट नाते निर्माण झाले.

ओडिशा राज्यातील आदिवासी जीवनाच्या विविध छटा त्यांच्या लेखनातून दिसतात. सामान्य माणसाला बलवान बनवून त्याला पुढच्या कथानकामध्ये कमजोर करायचे, ही पार चालत आलेली जुनी कथा आहे. याचा संदर्भ गोपीनाथ मोहंती अतिशय साध्या सोप्या भाषेत मांडतात. एक प्रकारे सामाजिक बांधिलकी वृत्ती जोपासणारे लेखक म्हणून त्यांची भारतीय साहित्यिकांमध्ये नोद होते. त्यांच्यातील संयम आणि इंद्रिय गोचरता यामुळे त्यांचे लेखन एक विशिष्ट उंची गाठते. केंद्रीय साहित्य अकादमी (१९५५), सोविएत लँड नेहरू पुरस्कार (१९७०) या पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले. भारतीय ज्ञानपीठाचा १९७३चा साहित्य पुरस्कार गोपीनाथ मोहंती यांना त्यांच्या माटीमटाल या कादंबरीसाठी प्रदान करण्यात आला. ही कादंबरी १९६२ ते १९६६ या कालावधीतील सर्व भारतीय भाषांतून निवडली गेली. त्या वर्षी हा पुरस्कार विभागून (कन्नड कवी द. रा. बेन्द्रे यांच्यासह) देण्यात आला. त्यानंतर इ. स. १९८१मध्ये त्यांना पदमभूषण या पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले आहे.

(साभार : इंटरनेट)

# प्रख्यात बासरीवादक पन्नालाल घोष



पन्नालाल घोष हे एक प्रख्यात बासरीवादक होते. त्यांचे पूर्ण नाव अमल ज्योती घोष असे होते. त्यांनी बासरी या वाद्यात अनेक सुधारणा केल्या, तसेच बासरी वादन हे भारतीय गायकीच्या जवळ नेऊन ठेवले. पन्नालाल घोष यांचा आज स्मृतीदिन आहे. त्यानिमित्त त्यांच्याविषयी जाणून घेऊया या लेखातून...

पन्नालाल घोष यांचा जन्म २४ जुलै १९११ रोजी बारिसाल (बांगला देश) येथे झाला. पन्नालाल घोष यांचे वडील अक्षयकुमार घोष हे उत्तम सतारिये होते. वयाच्या चौदाव्या वर्षीच पन्नालाल बासरीकडे आकृष्ट झाले. पुढे १९३४ मध्ये पन्नालाल घोष यांनी मास्टर खुशी महम्मद या संगीतकाराचे शिष्यत्व पत्करले. 'सराईकेला नृत्यमंडळी'त ते काही काळ संगीत दिग्दर्शक होते. 'सराईकेला नृत्यमंडळी'बरोबर १९३८ मध्ये पन्नालाल घोष यांना युरोपचा प्रवास घडला. गिरिजा शंकर चक्रवर्ती ह्यांच्याकडे १९३९ मध्ये आणि पुढे १९४७ च्या सुमारास उस्ताद अल्लाउद्दीन खाँ ह्यांच्याकडे पन्नालाल घोष यांनी संगीताचे अधिक शिक्षण घेतले.

पन्नालाल घोष हे चित्रपटक्षेत्रात १९४० ते १९४४ ह्या काळात संगीत दिग्दर्शक म्हणून होते व पुढेही तेथेच १९५६ पर्यंत बासरीवादक होते. या काळात पन्नालाल घोष यांनी बासरीवादनाचे स्वतंत्र कार्यक्रमही केले. आकाशवाणीच्या दिल्ली केंद्रात १९५६ पासून पन्नालाल घोष हे वाद्यवृंद निर्देशक होते. पन्नालाल घोष हे १९४० साली मुंबई येथे वास्तव्यास होते. त्यांनी बॉम्बे टॉकीजमध्ये संगीत दिग्दर्शकाचे आणि बासरीवादनाचे काम केले. पन्नालाल घोष यांनी बासरीत आमूलाग्र परिवर्तन घडविले, बासरीची लांबी ४०-४२ इंचांपर्यंत वाढविली. तसेच बासरीवर बोटे ठेवण्याचे वेगळे तंत्र विकसित केले. तसेच पंडितजींनी अनेक नवीन रागांची निर्मिती केली त्यातील राग जयंत हा एक महत्त्वाचा राग आहे.

पन्नालाल घोष हे बासरीवादनाच्या क्षेत्रातील एक युगप्रवर्तक होत. वेणुवादनाला भारतात दीर्घकालीन इतिहास असला तरी बासरीवादनाला एक स्वतंत्र व स्वायत्त दर्जा मिळवून देण्यात पन्नालाल घोष यांचा फार मोठा वाटा होता. ख्यालगायनातील आलापासारखे विलंबित संगीतविस्तार आणि सतार, सरोद इ. तंतुवाद्यातील 'झाला' सारखे द्रुत वादनप्रकार या दोहोंना बासरीवादनात अंतर्भूत करून पन्नालाल घोष यांनी या वाद्याची सांगीतिक विकसनक्षमता विस्तृत केली.

यासाठी त्यांनी संशोधन करून मोठ्या व्यासाची, अधिक लांबीची व परिणामतः अधिक स्वरक्षेत्राची बासरी तयार केली. अर्ध, पाव इ. स्वरांतरे आणि मींडकामासारखे संगीतालंकार पन्नालाल घोष यांनी बासरीवादनातून यशस्वी करून दाखविले. संगीत दिग्दर्शक आणि रचनाकार म्हणूनही पन्नालाल घोष यांनी कीर्ती मिळविली. पन्नालाल घोष यांच्या इतजार, बसंत ह्या चित्रपटांच्या संगीतरचना व 'आशा', 'बागेश्री', 'ऋतुराज', 'कलिंगविजय', 'भैरवी', 'ज्योतिर्मय अमिताभ' इ. वाद्यवृंदरचना गाजल्या आहेत. त्यांच्या शिष्यगणांत हरिप्रसाद चौधरी, देवेंद्र मुर्डेश्वर, बेडा देसाई इ. प्रसिद्ध बासरीवादकांचा समावेश होतो. अशा या श्रेष्ठ बासरीवादकाचे २० एप्रिल १९६० रोजी निधन झाले.

(साभार : इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

# प्रत्येक स्मार्टफोनचा कॅमेरा डाव्या बाजूलाच का असतो?



पूर्वी 'रोटी, कपडा और मकान' या मानवाच्या तीन मुलभूत गरजा होत्या. पण, गेल्या काही वर्षांपासून स्मार्टफोनदेखील मानवाची गरज बनला आहे. दूरवर बसलेल्या प्रियजनांशी बोलण्यासोबतच, बरीचशी दैनंदिन कामेही या मोबाईलच्या मदतीने काही मिनिटांत पूर्ण होतात. बहुतांश स्मार्टफोन्सची बेसिक डिझाईन सारखीच असते. प्रत्येक मोबाईलला समोर एक कॅमेरा, पाठीमागे दोन किंवा तीन कॅमेरे असतात. तुम्ही कधी विचार केलाय का, हे कॅमेरे मोबाईलच्या डाव्या बाजूलाच का असतात, उजव्या बाजूला का नसतात? त्यामागे एक खास कारण आहे...

आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात जवळपास सर्वांकडेच स्मार्टफोन आहे. इंटरनेटच्या या युगात स्मार्टफोनशिवाय जीवन जगणे कठीण झाले आहे. आता आपण जाणून घेऊया की, स्मार्टफोनमधील कॅमेरा डाव्या बाजूला का असतो. तुम्हाला आठवत असेल, सुरुवातीला बहुतांश लोकांकडे छोटे फीचर फोन असायचे, नंतर हळूहळू स्मार्टफोन बाजारात आले. या फोन्समध्ये कॅमेरा मध्यभागी होता. पण नंतर हळूहळू सर्व कंपन्यांनी कॅमेरा मोबाईलच्या डाव्या बाजूला वळवला.

**आयफोनपासून सुरुवात**

दिग्गज स्मार्टफोन कंपनी ॲपले सर्वप्रथम आपल्या आयफोनमध्ये डाव्या बाजूला कॅमेरा देण्यास सुरुवात केली होती. यानंतर, हळूहळू बहुतांश कंपन्यांनी हाच पॅटर्न स्वीकारला आणि कॅमेरा फोनच्या डाव्या बाजूला शिफ्ट केला. कॅमेरा डाव्या बाजूला ठेवणे, हे डिझाईन नसून त्यामागे खूप रंजक कारण आहे.

**डाव्या बाजूच्या कॅमेराचे कारण**

जगातील बहुतांश लोक डाव्या हाताने मोबाईल वापरतात. अशा स्थितीत मोबाईलच्या मागे डाव्या बाजूला बसवलेल्या कॅमेराने फोटो काढणे किंवा व्हिडीओ काढणे सोपे जाते. याशिवाय मोबाईल फिरवून लँडस्केप मोडमध्ये फोटो काढताना मोबाईलचा कॅमेरा वरच्या बाजूला राहतो, त्यामुळे लँडस्केप मोडमध्येही फोटो सहज काढता येतो. या कारणांमुळे मोबाईलमधील कॅमेरा डाव्या बाजूला ठेवला जातो.

# आद्य इतिहास संशोधक चिं.वि. वैद्य



**निमित्त**

चिंतामण विनायक वैद्य हे संस्कृत भाषेतील विद्वान होत. ते एक थोर ज्ञानोपासक, महाभारत-रामायणाचे संशोधक, मीमांसक व चतुरस्र ग्रंथकार होते. संस्कृत भाषेच्या व्यासंगामुळे त्यांनी रामायण-महाभारतासारख्या पौराणिक इतिहासाच्या अपरिचित भागांवर प्रकाश टाकला. आज त्यांचा स्मृतीदिन आहे.


१८ ऑक्टोबर १८६१ रोजी कल्याणमध्ये त्यांचा जन्म झाला. त्यांचे वडील विनायकराव हे वकील होते. ते कल्याणमध्येच वकिली करत. कल्याण तसेच मुंबईच्या एल्फिन्स्टन स्कूल व एल्फिन्स्टन कॉलेजात चिंतामणरावांचे शिक्षण पार पडले. १८८२मध्ये एमएची पदवी मिळवल्यानंतर १८८४मध्ये त्यांनी एलएलबीची पदवी संपादित केली. त्यानंतर कोल्हापूरमधील शिरोळ येथे त्यांनी काही काळ मुनसफ म्हणून नोकरी केली. त्यानंतर ठाण्याच्या कोर्टात वकील म्हणून त्यांनी काम केले. त्यानंतर उज्जैन येथे न्यायाधीश पदावर ते रुजू झाले.

१८९५ ते १९०४ या कालावधीत त्यांनी ग्वाल्हेरच्या सरन्यायाधीशपदाची जबाबदारी पार पाडली. १९०५मध्ये सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांनी लोकमान्य टिळकांसोबत राष्ट्रीय कार्यात स्वतःला वाहून घेतले. कोलकाता, सुरत आदी ठिकाणी काँग्रेसच्या अधिवेशनांना ते टिळकांसोबत गेले. टिळकांच्या निधनानंतर त्यांनी महात्मा गांधीजींसोबत कार्य करण्यास सुरुवात केली. त्यांनी निष्ठेने आणि आस्थेने राष्ट्रीय शिक्षणाचे कार्य केले. काही कालावधीनंतर चिंतामणरावांनी राजकारण सोडले. १८८९ ते १९३४ या कालावधीत वैद्यांनी विपुल लेखन केले. केसरी, विविधज्ञानविस्तार, इंदुप्रकाश, नेटिव्ह ओपिनियन आदी नियतकालिकांमधून त्यांचे स्फुटलेखन प्रसिद्ध झाले. त्यांचे एकूण २९ ग्रंथ प्रकाशित झाले आहेत.

यामध्ये ९ इंग्रजी आणि २० मराठी ग्रंथांचा समावेश आहे. महाभारत ए क्रिटिसिझम (१९०४), संक्षिप्त महाभारत (१९०५), रिडल ऑफ रामायण (१९०६), अबलोन्नतिलेखमाला (१९०६), एपिक इंडिया (१९०७), मानवधर्मसार -संक्षिप्त मनुस्मृति (१९०९), दुर्दैवी रंगू (१९१४), श्रीकृष्ण चरित्र (१९१६), महाभारताचा उपसंहार (१९१८), हिस्टरी ऑख मिडिव्हल हिंदु इंडिया ( ३ खंड, १९२१, १९२४ व १९२६), संस्कृत वाङ्मयाचा त्रोटक इतिहास (१९२२), मध्ययुगीन भारत (तीन खंड, १९२५), गझनीच्या महमूदाच्या स्वार्या (१९२६), ए हिस्टरी ऑफ संस्कृत लिटरेचर (१९२६), वैद्यांचे ऐतिहासिक निबंध (१९३१), शिवाजी द फाउंडर ऑफ मराठा स्वराज (१९३१), हिंदू धर्माची तत्त्वे (१९३१), महाभारताचे खंड - सभापर्व, विराटपर्व, उद्योगपर्व (१९३३-३५), संयोगिता नाटक (१९३४) हे त्यांनी लिहिलेल्या ग्रंथांपैकी काही ग्रंथ आहेत. चिं.वि. वैद्यांच्या 'महाभारत ए क्रिटिसिझम' या इंग्रजी ग्रंथावर लोकमान्य टिळकांनी केसरीतून सलग आठ अग्रलेख लिहिले. याद्वारे चिं.वि. वैद्य यांच्या ग्रंथांची मौलिकता स्पष्ट होते.


१९०८मध्ये पुणे येथे भरलेल्या सहाव्या मराठी साहित्य (ग्रंथकार) संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले. २० एप्रिल १९३८ रोजी त्यांचे निधन झाले. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# वजन कमी करण्यासाठी हळदीचे पाणी पिणे फायदेशीर



आपल्या घरात अनेक मसाले असतात. त्यांचा उपयोग जेवण बनवण्यासाठी केला जातो. परंतु अनेक मसाले आहेत त्याचा आरोग्यासाठीही फायदा होतो. हळद हा त्यातील एक प्रमुख मसाला आहे.

हळदीत अनेक औषधी गुण असतात, हळदीत अँटीऑक्सिडेंट्स, अँटीइन्फ्लेमेंटरी तसेच अँटीबॅक्टेरियल गुण असतात. त्यामुळे अनेक आजारांचा धोका कमी होतो. हळद आरोग्यासाठी फायदेशीर आहे. हळदीमुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढते तसेच वजन कमी होण्यासही मदत होते. यासाठी जाणून घेऊया हळदीचे पाणी कसे बनवावे आणि त्याचे इतर फायदे.

असे होते वजन कमी : हळदीत पोषक तत्व असतात, त्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते. हळदीत पॉलेफेनॉल करक्यूमिन कम्पाऊंड असतं त्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते. वजन कमी करण्यासाठी पाण्यात

असे बनवा हळद पाणी : हळदीचे पाणी बनवण्यासाठी हळदकुंडाची कुटलेली हळद घ्या. त्यात दोन कप गरम पाणी टाका. त्यानंतर त्यात मध मिक्स करा. पाणी थोडे कोमट झाल्यानंतर या पाण्याचे सेवन करा. शक्यतो रिकाम्या पोटी हे पाणी प्या त्यामुळे वजन लवकर कमी होण्यास मदत होती.

हळदीचे पाणी पिण्याचे मुख्य फायदे:

रोगप्रतिकारशक्ती वाढवते : हळदीतील कर्क्यूमिनमुळे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होऊन हंगामी आजारांपासून (सर्दी-खोकला) संरक्षण मिळते.

दाह आणि सूज कमी : संधिवात किंवा सांधेदुखी असल्यास, हळदीचे पाणी सांधेदुखी आणि सूज कमी करण्यास मदत करते.

पचनक्रिया सुधारते : रोज सकाळी हे पाणी पिल्याने पचनक्रिया सुधारते, बद्धकोष्ठता आणि गॅससारख्या समस्या कमी होतात.

त्वचा चमकदार होते : हळदीमध्ये अँटीऑक्सिडंट्स असतात, जे शरीरातील विषारी पदार्थ (Detox) बाहेर टाकतात आणि त्वचेची चमक वाढवतात.

वजन कमी करण्यास मदत : हे चयापचय (Metabolism) सुधारते, ज्यामुळे संतुलित आहारासोबत घेतल्यास वजन कमी होण्यास मदत होते.

मधुमेहावर नियंत्रण : हे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवण्यास मदत करते, विशेषतः टाइप २ मधुमेहासाठी फायदेशीर ठरू शकते.

# रस्त्याच्या कडेला उभ्या केलेल्या होर्डिंगने जीवित व वित्त हानी होण्याची शक्यता

## मुंबई-पुणे महामार्गावर नियमांची पायमल्ली

**चौक : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चार वरती पावलोपावली मोठ मोठे होर्डिंग उभे राहिले असून याकडे यंत्रणेचे पूर्णपणे दुर्लक्ष झाले आहे, की जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

सद्या मुंबई-पुणे रस्त्यावर दोन्ही बाजूला मोठमोठी होर्डिंग उभी राहिली असून, रात्री अपरात्री देखील उभी केली जात असून यावर आय.आर.बी. हे रस्ता देखभाल दुरुस्ती करणारी यंत्रणा, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचेही दुर्लक्ष होत आहे की जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे? असा प्रश्न उपस्थित होत आहे.




रस्त्यावरील होर्डिंग चे मुख्य दुष्परिणाम म्हणजे सुरक्षेचा अभाव होऊन वेळ पडल्यास जीवितहानी देखील होऊ शकते, निसर्ग सौंदर्याचे नुकसान होऊन दृश्य प्रदूषण वाढत चालले आहे, काही चुकीच्या जाहिरातींमुळे मानसिक ताण वाढत जाऊन चालकाचे नियंत्रण बिघडण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

मुंबई घाटकोपर सारख्या घटना घडू शकतात, हे होर्डिंग संरचनात्मक दृष्ट्या कमकुवत असू शकतात आणि सार्वजनिक आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकतात.जीवित व मालमत्तेची हानी, वादळ किंवा कमकुवत बांधकामामुळे होर्डिंग पडून गंभीर अपघात होऊ शकतात, ज्यात जीवितहानी देखील होऊ शकते,

मोठ्या होर्डिंगमुळे चालकांचे लक्ष विचलित होते, ज्यामुळे रस्ते अपघातांचा धोका वाढत आहे,रस्त्याच्या व परिसराच्या सौंदर्यात अडथळा निर्माण होत असून नैसर्गिक दृश्ये झाकली जाऊ शकत आहे. होर्डिंग साठी वापरलेले साहित्य याचा दर्जा माहित नसतो,अनेकदा होर्डिंगवर आक्षेपार्ह किंवा दिशाभूल करणाऱ्या जाहिराती असतात, ज्याचा नागरिकांच्या मानसिकतेवर नकारात्मक परिणाम होत आहे.

रस्त्याच्या सुरक्षिततेच्या नियमांचे पालन न केल्यास हे होर्डिंग्ज भविष्यात मोठे धोके बनू शकतात, यासाठी या रस्त्याची मालकी असणारे आणि रस्त्याची देखभाल दुरुस्ती करणाऱ्या यंत्रणेने त्वरीत लक्ष द्यावे, अशी मागणी होत आहे.

## ट्रकची विद्युत रोहित्राला धडक ; चालकावर गुन्हा

**खोपोली : प्रतिनिधी**

भरधाव वेगाने ट्रक चालवून रस्त्याच्या कडेला असलेल्या महावितरणाच्या विद्युत रोहित्रला धडक देऊन नुकसान केल्याची घटना सावरोली खारपाडा राज्य मार्गावर माडप गावाचे हद्दीत शनिवारी सकाळी घडली घडली.

याप्रकरणी ट्रक चालक निलेश केशव प्रसाद शाहू वय २१ रा. मध्य प्रदेश याचे विरुद्ध खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ट्रक चालक निलेश हा शनिवारी सकाळी दहा वाजण्याचे सुमारास सावरोली खारपाडा राज्य मार्गावरून जात असताना ट्रक अनियंत्रित होवून माडप गावाचे हद्दीतील स्वस्तिक कंपनी समोर खांबावर असलेल्या विद्युत रोहितला धडकला. यामुळे १००केव्हीच्या विद्युत रोहित्रचे नुकसान झाले असून बाजूला उभे असलेल्या लोकांच्या जीविताला देखील धोका निर्माण झाला होता.

याप्रकरणी महावितरणाचे कर्मचारी दत्ता विरले यांनी खालापूर पोलीस ठाण्यात तक्रार दिली असून पुढील तपास पोलिस हवालदार जानू शेळके करत आहे.

## खोपोलीत आदि-विमल पारणा महोत्सव भव्य मिरवणूक

**खोपोली : प्रातिनिधी**

दि १९ व २० या दोन दिवस खोपोली शहरातील जैन बांधवांनी आदि-विमल पारणा महोत्सवाचे आयोजन केले आहे. रविवारी दि १९ रोजी या निमित्ताने भव्य मिरवणूक व शोभा यात्रा काढण्यात आली. ही मिरवणूक भव्य , भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली . यावेळी मोठ्या संख्येने जैन समाजबांधव उपस्थित होते. मिरवणुकीच्या स्वागतासाठी नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे , उपनगराध्यक्ष विक्रम साबळे, माजी नगराध्यक्ष रामदास शेंडे , पोलीस उपअधीक्षक खालापूर डॉ विशाल नेहुल पाटील , खोपोलीचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक सचिन हिरे आदी आवर्जून उपस्थित होते.

परमपूज्य गुरुदेवांच्या पावन सान्निध्यात आयोजित या सोहळयाला मोठ्या संख्येने जैन बांधव , भाविक व नागरिक उपस्थित होते. भव्य शोभायात्रेमुळे संपूर्ण खोपोली शहर भक्तीमय आणि उत्सवाच्या रंगात न्हाऊन निघाले.या पवित्र प्रसंगी जैन भाविकांना जैन धर्मीय परमपूज्य गुरुदेवांचे दर्शन घेण्याचा लाभ मिळाला. खालची खोपोली , बाजारपेठ मार्गे ही भव्य मिरवणूक गगनगिरी महाराज मठातील मैदानावर आयोजित भव्य सभागृहाला येऊन संपुष्टात आली.

आदि-विमल पारणा महोत्सवाला जैन समाजात अत्यंत महत्व असून , ज्या महिलांनी व पुरुषांनी पवित्र उपवास केला आहे त्यांची रथात बसून मिरवणूक काढण्यात आली होती.



## स्पर्धांमुळे युवकांना आपले कौशल्य दाखवण्याची उत्तम संधी मिळते -माजी खासदार धैर्यशील पाटील

**पेण ; रामप्रहर वृत्त**

मोहाडी येथे श्री वाघजाई ग्रामस्थ मंडळ, मोहाडी यांच्या वतीने भव्य कबड्डी स्पर्धेचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेच्या मैदानाचे पूजन व उद्घाटन माजी खासदार तथा भाजप द.रायगड जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील यांचे हस्ते झाले

यावेळी बोलतांना ,कबड्डी हा आपल्या ग्रामीण भागातील अत्यंत लोकप्रिय आणि परंपरागत खेळ असून, अशा स्पर्धांमुळे युवकांना आपले कौशल्य दाखवण्याची उत्तम संधी मिळते. तसेच गावामध्ये क्रीडा संस्कृती रुजवण्यासाठी आणि युवकांना प्रोत्साहन देण्यासाठी अशा उपक्रमांचे विशेष महत्त्व आहे.

तसेच मोहाडीला जाणारा रस्ता व पूल (ब्रिज) यांचे काम पूर्ण झाल्यामुळे ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला आहे. या विकासकामामुळे गावाचा संपर्क अधिक सुलभ झाला असून, याच आनंदातून सर्व ग्रामस्थ व माताभगिनींनी उत्स्फूर्तपणे स्वागत करून प्रेम व्यक्त केले, याबद्दल मनःपूर्वक आभार.



या प्रसंगी आमदार रविशेठ पाटील,राजिप सभापती वैकुंठ पाटील, उद्योजक राजूशेठ पिचिका, मंगेश दळवी, दिनेश खैरे, भाऊदा पाटील, मोहाडीचे माजी सरपंच मालूदा तसेच भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांनी स्पर्धेत सहभागी सर्व खेळाडूंना मनःपूर्वक शुभेच्छा देत, त्यांच्या उज्ज्वल क्रीडा भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या

## नारंगी येथील शाळेत गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य

**खोपोली : प्रतिनिधी**

नारंगी गावी तालुका.खालापूर जि. रायगड येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतील पहिली ते सातवी च्या ६४ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे प्रशीक संस्थेच्या माध्यमातून दिनांक१० एप्रिल २०२६ रोजी वाटप केले यावेळी प्रशीक संस्थेचे कार्याध्यक्ष बीडी जाधव , सरचिटणीस गरुड , सहचिटणीस थुले रावसाहेब सुधाकर जाधव, शांताराम गायकवाड ,बीके गायकवाड रावसाहेब, शिक्षणाधिकारी प्रकाश जाधव , उपसरपंच देवेंद्र देशमुख, सुर्यकांत देशमुख, भरत देशमुख, पोलीस पाटील पंकज, जागृती जाधव , बाबू वाघुले आणि ग्रामस्थ आणि शिक्षक उपस्थित होते. दिपक गाडे त्यांनी छानपैकी स्वागत आणि सुत्रसंचालन केल.



दरम्यानः संस्थेतर्फे दरवर्षी दहावी व १२ वी मध्ये ८० टयापेक्षा जास्त मार्क्स मिळवलेल्या विद्यार्थ्यांना त्यांचा प्राथमिक खर्च भागवणे साठी प्रत्येकी ₹ दहा हजार देतो असे गेल्या तीन वर्षात महाराष्ट्रात ₹ ५,२००००/- रकम विद्यार्थ्यांना प्रदान केली . संस्थेचे केजी टू पीजी शिक्षण संस्था काढण्याचे प्रयत्न आहेत वर्षभरात त्याच कामात यशस्वी होण्यासाठी संस्था प्रयत्नशील आहे. विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत दिलेले जिल्हे बुलढाणा, वाशिम,अकोला ,यवतमाळ, कोल्हापूर, वर्धा, रत्नागिरी, रायगड, ठाणे, पालघर,पुणे औरंगाबाद. या ठिकाणी देण्यात आली.

# पशुपालकांना किसान क्रेडिट कार्डवर मिळणार तीन लाखांपर्यंत बिनव्याजी कर्ज



### राज्य शासनाची विशेष केसीसी मोहीम

**पाली : प्रतिनिधी**

राज्यातील पशुपालन, शेळी-मेंढीपालन आणि कुक्कुटपालन करणाऱ्या शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी पशुसंवर्धन विभागाने कंबर कसली आहे. पशुपालकांना दैनंदिन खर्चासाठी आणि पशुधनाच्या देखभालीसाठी आर्थिक चणचण भासू नये, या उद्देशाने 'पशुसंवर्धन किसान क्रेडिट कार्ड' (KCC) मोहीम वेगाने राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत पात्र पशुपालकांना ३ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज अत्यंत सवलतीच्या दरात, किंबहुना शून्य टक्के व्याजाने उपलब्ध करून दिले जात आहे.

ज्या शेतकऱ्यांकडे अद्याप किसान क्रेडिट कार्ड नाही, त्यांना १.६० लाख रुपयांपर्यंतचे कर्ज कोणत्याही तारणाशिवाय मिळेल. जर संबंधित शेतकरी दूध संस्थेचा सभासद असेल आणि संस्थेने हमी दिली, तर ही कर्ज मर्यादा ३ लाख रुपयांपर्यंत वाढवता येते. ज्यांच्याकडे आधीच पीक कर्जाचे किसान क्रेडिट कार्ड आहे, त्यांनाही पशुपालनासाठी ३ लाखांपर्यंत पतमर्यादा वाढवून घेता येईल. कर्जाचा मूळ व्याजदर ९% असला तरी, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी केंद्र आणि राज्य सरकारने मोठी सवलत जाहीर केली आहे. यामध्ये केंद्र सरकारची सवलत ३% व्याज परतावा. राज्य सरकारची सवलत ११ फेब्रुवारी २०२६ च्या निर्णयानुसार ४% व्याज परतावा. बँक सवलत बँकांनाही २% व्याज सवलत देण्यात आली आहे . अशा प्रकारे, जे पशुपालक घेतलेल्या कर्जाची वेळेत परतफेड करतील, त्यांना प्रत्यक्षात शून्य टक्के व्याजाचा लाभ घेता येईल.

### योजनेसाठी पात्रता आणि अटी

***या योजनेचा लाभ घेण्यासाठी पशुसंवर्धन विभागाने खालील निकष निश्चित केले आहेत. पशुपालन प्रकल्पातील सर्व जनावरांची 'भारत पशुधन' (NDLM) पोर्टलवर नोंदणी असणे अनिवार्य आहे. अर्जदाराने यापूर्वी केंद्र, राज्य किंवा जिल्हा परिषदेच्या कोणत्याही इतर अनुदान योजनेचा लाभ घेतलेला नसावा. कर्ज घेतलेल्या तारखेपासून एका वर्षाच्या आत संपूर्ण रक्कम परत करणे आवश्यक आहे.***

इच्छुक पशुपालकांनी अधिक माहितीसाठी आपल्या जवळच्या पशुवैद्यकीय चिकित्सालयात भेट द्यावी किंवा १९६२ या हेल्पलाइन नंबरवर संपर्क साधावा. जिल्ह्यातील पशुसंवर्धन उपआयुक्त या योजनेचे सनियंत्रण अधिकारी म्हणून काम पाहत आहेत.

## खोपोलीत उन्हाचा पारा वाढला, दुपारी शहर सामसूम!

**खोपोली :** मागील तीन दिवसांपासून खोपोली व परिसराचा पारा वाढला आहे. तापमान ३८- ४० अंशावर पोहचले आहे .कडक उन्ह व गरम हवा मुळे दुपारी एक वाजल्यापासून संध्याकाळी चार वाजेपर्यंत बाजारपेठ व अन्य नियमित वळदडीच्या ठिकाणी ही माणसे दिसण्याची कमी झाली आहेत. वाढलेले तापमान व गरम हवेचा आपल्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो म्हणून या दिवसात अधिक काळजी घेण्याची गरज असल्याचे डॉक्टरांचा सल्ला आहे . शक्यतो दुपारच्या वेळी घरा बाहेर किंवा ऑफिस बाहेर जाण्याचे टाळावे असा सल्ला खोपोलीच्या आरोग्य अधिकारी डॉ संगीता वानखेडे यांनी दिला आहे.घरातील लहान मुले व जेष्ठ नागरिकांची अधिक काळजी घ्यावी व शरीरात जास्तीतजास्त पाणी व अन्य शित पौष्टिक द्रव पदार्थ जातील याकडे जाणीवपूर्वक लक्ष देण्याचेही त्यांनी सांगितले आहे.

**रोहा अष्टमी नगर परिषद**
**ता. रोहा, जि. रायगड पिन कोड- ४०२१०९.**
फोन नं. कार्यालय-०२१९४-२३५७३७
Email : rohanagarpalika@gmail.com

**जाहिर ई-निविदा सुचना**

रोहा अष्टमी नगरपरिषद हद्दीतील विकास कामाकरिता कामाचा अनुभव असणा-या ठेकेदाराकडून विहित नमुन्यात ई-निविदा मागविणेत येत आहेत. सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई-निविदाद्वारे ऑनलाईन पद्धतीने संगणक प्रणालीवर होईल. सदर निविदा सुचना प्रसिद्धी, आवश्यक असणारी कागदपत्रे, शुद्धीपत्र इत्यादी माहिती https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक 20/04/2026 रोजीपासून उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. निविदा सादर करण्याची अंतिम तारीख दिनांक 28/04/2026 रोजीपर्यंत राहील.

क्र. रोनप/बांवि/ई- निविदा सूचना/२२६/२०२६
दिनांक- १७/०४/२०२६

**सही/-**
**(अजयकुमार एडके)**
मुख्याधिकारी
रोहा अष्टमी नगर परिषद

**सही/-**
**(कु. वनश्री अवनी समीर शेडगे)**
नगराध्यक्ष
रोहा अष्टमी नगर परिषद

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक ०८/२०२६-२०२७ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | महाड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.... सावित्री धरणाजवळ नामफलकांची दुरुस्ती आणि ग्लो साइन बोर्ड लावण्याचे काम करणे. | ₹ २८,९५,७१५.०० |
| २ | पेण अलिबाग प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती....... नागोठाणे येथील अशुद्ध जलउदंचन केंद्रातील २ नग १०० बीएचपी सबमर्सिबल पंपासह पॅनलची तातडीची दुरुस्ती करणे व अनुषंगिक कामे करणे. | ₹ ३७,९८,९२४.०० |
| ३ | पेण अलिबाग प्रादेशिक व नागोठाणे पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.... जलशुद्धिकरण केंद्रातील ५ किलो/तास आणि १० किलो/तास क्लोरीनीकरण संयंत्र आणि क्लोरीन गळती शोषक प्रणालींची नियतकालिक देखभाल व दुरूस्ती करणे. | ₹ २८,२५,९२०.०० |

उपरोक्त कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक २१/०४/२०२६ ते दिनांक ०५/०५/२०२६ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक २७/०४/२०२६ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक २९/०४/२०२६ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

# वस्त्र पुनर्प्रक्रिया प्रकल्पाची महापौरांकडून पाहणी

## नवी मुंबईत महिला सक्षमीकरणासोबतच आत्मनिर्भरतेला बळ

**नवी मुंबई : बातमीदार**

केंद्र सरकारच्या वस्त्रोद्योग मंत्रालयांतर्गत वस्त्र समिती आणि नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने सीबीडी बेलापूर येथे सुरू असलेल्या वस्त्र पुनर्प्रक्रिया प्रकल्पास महापौर सुजाता पाटील यांनी भेट देऊन संपूर्ण प्रक्रियेचा आढावा घेतला.

कपड्यांचा कचरा कमी करण्यासोबतच त्याला पुनर्प्रक्रियेव्दारे नवे रूप देऊन, फॅशन सेन्स जपत फॅशनेबल उत्पादने निर्माण करणारा हा आगळावेगळा, पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्यासाठी केंद्र सरकारने नवी मुंबईची निवड केली, ही अभिमानास्पद बाब असल्याचे यावेळी महापौर सुजाता पाटील यांनी सांगितले.



या माध्यमातून महिलांना रोजगाराचे हक्काचे साधन उपलब्ध होत असून त्या आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनत आहेत. महिला सक्षमीकरणासोबतच त्यांना आत्मनिर्भर बनविणाऱ्या या प्रकल्पाचा विस्तार करण्याचा मनोदय याप्रसंगी महापौर पाटील यांनी व्यक्त केला.

नवी मुंबई महानगरपालिका, केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्रालय, एसबीआय फाऊंडेशन आणि टिसर इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या या केंद्रामध्ये हा प्रकल्प अत्यंत उत्तम प्रकारे राबविण्यात येत आहे. नागरिकांनी वापरून झालेले व टाकाऊ ठरणारे कपडे सोसायट्यांमध्ये विशिष्ट प्रकारच्या कचरापेट्यांद्वारे संकलित करण्यात येत आहेत. टाकाऊ परंतु सुस्थितीतील कपड्यांच्या संकलनासाठी विशेष वाहनाची व्यवस्था करण्यात आली आहे. हे वाहन सोसायट्यांमध्ये जाऊन तसेच ९२ ठिकाणी असलेल्या 'थ्री आर' सेंटर्समधून कपडे संकलित करून प्रक्रियास्थळी आणते.

येथे आलेल्या जुन्या कपड्यांचे श्रेणीनुसार वर्गीकरण केले जाते. त्यानंतर कपड्यांच्या स्थितीनुसार आवश्यक प्रक्रिया करून पुनर्प्रक्रियायोग्य वस्त्रांपासून नव्या वस्तूंची निर्मिती (अपसायकलिंग) केली जाते.

# पार्किंगच्या वादातून नेरूळमध्ये हाणामारी; १६ जणांवर गुन्हा

**नवी मुंबई: बातमीदार**

नेरूळ सेक्टर २० येथील नेरूळ गाव परिसरात किरकोळ पार्किंगच्या वादातून दोन गटांमध्ये तुफान हाणामारी झाल्याची घटना घडली. यात महिलांना देखील मारहाण करण्यात आलीं याप्रकरणी मारहाण, शिवीगाळ आणि धमकी दिल्याप्रकरणी महिलांसह तब्बल १६ जणांविरोधात नेरूळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही घटना १६ एप्रिल रोजी सायंकाळी सुमारे सहा वाजता नेरूळ गावातील शिवसेना शाखा जवळील घर क्रमांक ६३४ समोर घडली. तक्रारदार सुनीता बाबूराव भोपी यांच्या



मुलगा प्रणित याने घरासमोर कार उभी केली होती. त्यावेळी ललेश ठाकूर याने त्याची दुचाकी कारसमोर आडवी लावल्याने वाहन काढताना अडथळा निर्माण झाला. यावरून दोघांमध्ये वाद निर्माण झाला.वाद वाढताच ललेश ठाकूर, अजित भोपी आणि सुजित भोपी यांनी प्रणित याच्याशी शिवीगाळ करून भांडण सुरू केले.

काही वेळातच दोन्ही बाजूंचे कुटुंबीय घटनास्थळी जमले. तक्रारदारांची सुन प्रेरणा हिने वाद मिटवण्याचा प्रयत्न केला असता, महिलांकडून तिचे केस ओढून मारहाण करण्यात आल्याचा आरोप आहे.

यानंतर परिस्थिती आणखी चिघळली. तक्रारदार व त्यांच्या कुटुंबीयांनी बचावासाठी पुढे येताच आरोपींनी लोखंडी रॉडने मारहाण केल्याचा आरोप तक्रारीत केला आहे. तसेच आणखी काही व्यक्तींनी घटनास्थळी येऊन लाथाबुयांनी मारहाण व शिवीगाळ केल्याचेही नमूद केले आहे.

या प्रकरणी १६ जणांविरोधात नेरूळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# स्वच्छ सर्वेक्षणांतर्गत स्वच्छता अधिकारी आणि निरीक्षकांची कार्यशाळा

**नवी मुंबई : बातमीदार**

स्वच्छ सर्वेक्षणामध्ये देशातील स्वच्छ शहरांच्या नियमित क्रमवारीपेक्षा उच्च स्थानावरील 'सुपर स्वच्छ लीग' या विशेष कॅटेगरीमध्ये देशातील ४ सर्वोत्तम स्वच्छ शहरात नवी मुंबईचा समावेश असून हे मानांकन कायम राखण्यासाठी तसेच स्वच्छतेमधील गुणवत्ता उंचाविण्यासाठी स्वच्छता अधिकारी व स्वच्छता निरीक्षक, उप स्वच्छता निरीक्षक यांची विशेष क्षमतावृध्दी कार्यशाळा नमुंमपा मुख्यालयातील ज्ञानकेंद्रात संपन्न झाली.

याप्रसंगी मार्गदर्शन करताना अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांनी 'सुपर स्वच्छ लीग' मध्ये समाविष्ट 'सुपर स्वच्छ शहर' म्हणून आपल्याला ८५ टक्के पेक्षा अधिक गुणांकन मिळवायचेच आहे ही आपली जबाबदारी असल्याचे सांगितले. त्या अनुषंगाने सिटी प्रोफाईल भागांवर विशेष लक्ष देण्याचे निर्देश देण्यात आले. कचऱ्याचे निर्मितीच्या ठिकाणीच ओला, सुका, घरगुती घातक अशा ३ प्रकारे कचऱ्याचे वर्गीकरण हा सर्वाधिक महत्वाचा भाग असून त्याचे प्रमाण वाढविण्यावर भर देण्यासाठी अधिक कृतीशील व्हावे तसेच सार्वजनिक ठिकाणी रस्त्यांवर लावलेल्या लिटर बिन्सची दुरूस्ती आणि त्यामधील कचरा नियमित उचलला जाण्याकडे काटेकोर लक्ष देण्याचे त्यांनी निर्देशित केले.

स्वच्छ शहराचे मानांकन मिरवताना ते टिकविण्याची जबाबदारीही आपलीच आहे हे लक्षात घेत नागरिकांचा सहभाग



आणि प्रतिसाद वाढविण्यासाठी नगरसेवकांचे संपूर्ण सहकार्य घ्यावे असे अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांनी सूचित केले. वाशीगावातून 'सुगंधी अंगण अभियाना'ला सुरूवात झालेली असून त्याठिकाणी मिळालेला नागरिकांचा उत्साही प्रतिसाद पाहता या अभियानाची व्याप्ती शहरात इतरही भागात वाढवावी अशा सूचना त्यांनी दिल्या.

शहरातील मुख्य रस्ते, जागा यावर लक्ष देण्यासोबतच दुर्लक्षित जागांवरील स्वच्छतेकडेही लक्ष देऊन त्यांची स्वच्छता व सुशोभिकरण यापुढील काळात हाती घेऊया असे ते म्हणाले. शौचालयांची देखभाल, दुरूस्ती व स्वच्छता सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभागामार्फत पाहिली जात असून त्याकडेही स्वच्छता अधिकारी व निरीक्षकांनी लक्ष द्यावे अशा सूचना देण्यात आल्या.

साफसफाई करताना ती केलेल्या कामातून प्रदर्शित झाली पाहीजे असे सांगत प्रत्यक्ष दर्शनी स्वच्छतेवर भर देण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले. त्याचप्रमाणे प्लास्टिक पिशव्यांचा वापर थांबविण्यासाठीही अधिक प्रभावीपणे काम करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

सध्या उन्हाळा कडक असून सफाईकर्मींच्या आरोग्याची काळजी घ्यावी, त्यांच्याकरिता पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी असेही निर्देश देण्यात आले. सद्यस्थितीत पावसाळापूर्व नाले व गटारे सफाई सुरू असून त्यांच्या सफाईतून निघणारा गाळ काठावर जरा सुकला की लगेच उचलून नेण्याचे कार्यनियोजन करावे आणि त्याची तत्पर अंमलबजावणी करावी असेही सूचित करण्यात आले.

'स्वच्छ भारत मिशन'च्या वतीने प्रत्येक मानांकित शहराला 'स्वच्छ शहर जोडी' उपक्रमांतर्गत ५ शहरे जोडून देण्यात आली असून त्या अंतर्गत सर्वोत्तम स्वच्छ शहरांनी या ५ लहान शहरांना स्वच्छतेतील गुणवत्ता वाढविण्याविषयी मार्गदर्शन करावयाचे आहे. यानुसार नवी मुंबई महानगरपालिकेकडे कन्नड, जिंतूर, केज या ३ नगरपंचायती आणि लोणार व मलकापूर या २ नगरपरिषदांना मार्गदर्शन करण्याची जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे.

त्यामुळे नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रांतील स्वच्छतेप्रमाणेच स्वच्छ शहर जोडीमधील ५ शहरांतील स्वच्छता गुणवत्तावाढीकडेही लक्ष देण्याची गरज अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांनी लक्षात आणून दिली.

स्वच्छ सर्वेक्षणातील सिटी प्रोफाईल भागांकडे विशेष लक्ष देतानाच गावठाणे व झोपडपट्टी भागातील स्वच्छतेकडेही नवीन संकल्पना उपयोगात आणून कार्यवाही सुरू करावी असे अतिरिक्त आयुक्तांनी सांगितले. स्वच्छता करणे हे आपले कर्तव्य आहेच मात्र ते नागरिकांचे सहकार्य आणि सक्रिय सहभाग याशिवाय यशस्वी होणे शक्य नाही त्यामुळे महापौर, उपमहापौर, सर्व पदाधिकारी, नगरसेवक यांच्या सक्रिय सहयोगातून व्यापक जनजागृतीवर भर द्यावा असेही अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांनी सूचित केले.

# महिला आरक्षणाला विरोध करणाऱ्या काँग्रेसचा शिवसेनेतर्फे करंजाडेत निषेध

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकसभेत महिला आरक्षणाला विरोध करणाऱ्या काँग्रेस पक्षाचा शिवसेना (शिंदे) उरण विधानसभा यांच्या वतीने जिल्हाप्रमुख विनोद साबळे यांच्या उपस्थितीत १८ एप्रिल रोजी करंजाडे येथे जाहीर निषेध करण्यात आला. यावेळी काँग्रेसच्या विरोधात जोरदार घोषणा देण्यात आल्या.

यावेळी विनोद साबळे (जिल्हा प्रमुख), मेघा दमडे, विनिता बर्फे, रमेश म्हात्रे, प्रगती ठाकूर, मिरेंद्र शहारे, अनु सिंग, राहुल सुखासे, कुनाल कनोजिया, अक्षय टीके, गोरखनाथ नागरगोजे, प्रदीप हाडवळे, राजू नलावडे, निलेश शिंगाडे, दिनेश धामसकर,काजल पाटील, रंजिता सिंग, उषा दिक्षित, विमल कर्डे, आशा कांबळे, वैशाली रजु देवळे, अनिता घाडगे,अश्विनी भिसाळ, उर्मिला धुमाळ, लंका मोरे, प्रिती शहारे, निशा खरात, विद्या पाटील यांच्यासह अनेक शिवसेनेचे कार्यकर्ते, पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी उपस्थित महिलांनी काँग्रेसच्या नेतृत्वावर टिका केली




# आठ वर्षीय अक्षरचा पोहण्याचा विक्रम



**उरण : बातमीदार**

उरणमधील सेंट मेरी कॉन्व्हेंट हायस्कूलमध्ये शिकणाऱ्या ८ वर्षीय अक्षर दिपाली चेतन पाटील याने ऐतिहासिक कामगिरी केली आहे. १७ एप्रिल २०२६ रोजी पहाटे १ वाजून ५९ मिनिटांनी अटल सेतूजवळून समुद्रात झेप घेत त्याने ४ वाजून २९ मिनिटांनी गेटवे ऑफ इंडिया गाठले. १७ किमीचे अंतर त्याने २ तास २९ मिनिट २९ सेकंदात पूर्ण केले.

महाराष्ट्र हौशी जलतरण संघटनेचे निरीक्षक सुनील मयेकर यांच्या देखरेखीखाली ही मोहीम पार पडली. उरण तालुक्यातील केगांव गावचा रहिवासी असलेला अक्षर पाटील हा परिवार, 'सी स्विमिंग टीम' आणि मित्र परिवाराच्या उपस्थितीत पोहला. या वयात केलेल्या कामगिरीमुळे उरण तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.

# ट्रकची दुचाकीला धडक, तरुण जखमी

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

भरधाव वेगाने आलेल्या ट्रकने दुचाकीला धडक दिली. या धडकेत ३२ वर्षीय अक्षय खानावकर (राहणार नावडे) हा जखमी झाला. १७ एप्रिल रोजी ट्रक चालका विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. अक्षय खानावकर हा त्याची दुचाकी घेऊन मुंब्रा पनवेल हायवे नावडे ब्रिज जात होता. यावेळी ट्रक क्रमांक आर जे ११ जीडी ३७०९ वरील चालकाने भरधाव वेगाने ट्रक चालवला आणि दुचाकीला धडक दिली. या धडकेत अक्षय याच्या उजव्या पायाचे हाड फ्रॅक्चर झाले.



# जासई येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

**उरण : बातमीदार**

फुले शाहु आंबेडकर सामाजिक प्रतिष्ठान जासई , नवी मुंबई यांच्या वतीने विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा १३५ वा जयंती उत्सव मोठ्या आनंदात साजरा करण्यात आला , सकाळी जासई हायस्कुल येथे सर्व महापुरुषाच्या पुतळ्यास पुष्पार्पण करण्यात आले व नंतर सावित्रीबाई फुले नगर येथे मान्यवरांचे आगमन व स्वागत करून कार्यक्रमाचे उदघाटन करण्यात आले. या प्रसंगी उरण पंचायत समिती सदस्या निर्मला नरेश घरत उपस्तिथ होत्या.या प्रसंगी रायगड जिल्हा रिपब्लिकन सेना उपाध्यक्ष सुधीर पवार यांनी आपले विचार मांडले व रिपब्लिकन सेना सरचिटणीस प्रभाकर सावंत यांनीही जयंती दिनाच्या शुभेच्छा दिल्या , कार्यक्रमाचे दिप प्रज्वलित करून कामगार नेते व शरद पवार गटाचे प्रदेश सरचिटणीस संतोष रोहिदास घरत यांनी उपस्तिथ आंबेडकरी जनतेस मार्गदर्शन व शुभेच्छा दिल्या.आपण एकत्रित राहूनच कुठलेही कार्य पुढे नेऊ शकतो हेच त्यांनी जयंती दिनी सांगितले तसेच कार्यक्रमास रयत शिक्षण संस्थेचे माजी व्हा. चेअरमेन नूरा शेख सर यांनीही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा समाजाप्रती त्याग व आपण यातून आपल्या मुलांना शिक्षण देणे हे किती गरजेचे आहे ते सांगितले. जासई ग्रामपंचायत सदस्य व माजी सरपंच धिरज घरत यांनी हि शुभेच्छा दिल्या व आजही उपेक्षित वर्गासाठी आपण याच जयंती च्या मार्फत काय केले पाहिजे , जेणेकरून समाजाच्या शेवट पर्यंत मुलांना शिक्षण कसे घेता येईल यावर त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.ग्रामपंचायत सदस्य आदित्य यशवंत घरत यांनी फुले शाहू आंबेडकर सामाजिक प्रतिष्ठाण च्या जयंती ला आल्यावर प्रत्येक वर्षी या ठिकाणी कुणी डॉक्टर तर वकील , तर शासकीय अधिकारी , अनेक मुलं घडवण्याचे काम या ठिकाणी चालू आहे आणि आम्हाला हे चित्र दिसल्यावर खरच अभिमान वाटतो या शब्दात त्यांनी आपले विचार मांडले. अनेक मान्यवरांनी आपले विचार मांडले.कार्यक्रमाच्या अध्यक्षा भाग्यश्री मुंजाजी मस्के यांनीही आपले अध्यक्षीय भाषण केले , स्त्रियांनी शिकले पाहिजे आणि पुढे येऊन चळवळीचे काम केले पाहिजे असे त्यांनी सांगितले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजय मस्के आणि सुरज पवार यांनी केले तर अनेक विध्यार्थाने आपले विचार मांडले व काही विध्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर असलेल्या गीतावर नृत्य केले सर्व मुलांचे मान्यवरांच्या हस्ते अभिनंदन करण्यात आले, व कार्यक्रमाच्या शेवटी भोजन देण्यात आले , या कार्यक्रमास अनेक ठिकाणाचे, विविध भागातील पदाधिकारी उपस्थित होते.हा कार्यक्रम फुले शाहु आंबेकर सामाजिक प्रतिष्ठाण जासई यांच्या सर्व सभासदांनी व रमाई महिला बचत गट आणि यशोधरा महिला बचत गट यांच्या सर्व सभासद यांनी उत्तम नियोजन करून यशस्वीरित्या पार पाडला. या कार्यक्रमास जासई , एस सी ठाकूर कॉलनी ,फुले नगर , शिवाजीनगर , रेल्वे कॉलनी , शिर्के कॉलनी , नवघर , कोपर येथून आलेले सर्व अनुयायी उपस्थित होते.

# वाढवण बंदर प्रकल्पाच्या प्रगतीचा आढावा

**उरण : बातमीदार**

वाढवण पोर्ट प्रकल्प लिमिटेड (व्हीपीपीएल) चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री गौरव दयाल, भा.प्र.से. यांनी भारतातील १३ वे प्रमुख बंदर असलेल्या या महत्त्वाकांक्षी वाढवण बंदर प्रकल्पाच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी आणि पुढील वाटचालीचा आराखडा निश्चित करण्यासाठी उच्चस्तरीय आढावा बैठक आयोजित केली. या बैठकीत प्रकल्पाचा पुढील वाटचाल, रस्ते जोडणीसाठी आवश्यक जमीन संपादन, मत्स्य व्यवसायाशी संबंधित धोरणात्मक बाबी तसेच स्थानिक मनुष्यबळाच्या कौशल्यविकासासाठी राबविण्यात येत असलेल्या वाढवण पोर्ट कौशल्य विकास कार्यक्रमाचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

डॉ. इंदू राणी जाखर, भा. प्र. से., जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी, पालघर, सुश्री प्रेरणा देशभरतर, भा. प्र. से., मत्स्य आयुक्त, मुंबई, तसेच श्री रविश कुमार सिंह, भा. रे. वा. से., उपाध्यक्ष, जेएनपीए व मुख्य कार्यकारी अधिकारी, व्हीपीपीएल हेही या बैठकीस उपस्थित होते व त्यांनी चर्चेत सक्रिय सहभाग नोंदविला.

या बैठकीस केंद्र व राज्य शासनातील विविध महत्त्वाच्या विभागांतील आणि संस्थांतील इतर वरिष्ठ अधिकारी व प्रतिनिधी उपस्थित होते. यामध्ये बंदर प्रशासन, जिल्हा प्रशासन, कायदा अंमलबजावणी यंत्रणा, वन व मत्स्य विभाग यांचे अधिकारी तसेच एनएचएआय, डीविइटी, भारतीय रेल्वे, तांत्रिक सल्लागार आणि इतर कौशल्य विकास संस्थांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते.महत्त्वाच्या रस्ते पायाभूत सुविधांसाठी जमीन संपादनाची प्रक्रिया गतीमान करण्याची आवश्यकता बैठकीत अधोरेखित करण्यात आली, जेणेकरून बंदराशी अखंड आणि सुरळीत जोडणी सुनिश्चित करता येईल.

# वादग्रस्त म्युझिक फेस्टिव्हलला सिडकोने परवानगी नाकारली

## कायदा सुव्यवस्था बिघडण्याची भीती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कळंबोलीत नियोजित वादग्रस्त लाईव्ह म्युझिक फेस्टिव्हलला जागा देण्यास सिडकोने नकार देत परवाणगी नाकारली असल्याचे स्पष्ट झाले आहे.त्यादृष्टीने दि.१७ रोजी सिडको प्रशासनाने आयोजक डी एन ए इंटरटेन्मेन्ट नेटवर्क प्रा.ली यांना पत्राद्वारे कळविले आहे.

या कार्यक्रमात मद्यसेवन करून होणारा नंगा नाच पाहता स्थानिक कळंबोली पोलिसांनी कायदा सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण होण्याची शक्यता सिडकोला पत्रव्यवहार करून व्यक्त केली होती.त्यानुसार सिडकोच्या प्रभारी सहाय्यक वसाहत अधिकाऱ्यांनी दि.२१ ते २६ एप्रिल दरम्यान सेक्टर १७ भूखंड क्रमांक ४ येथील रॉयल स्टॅग बुमबॉक्स संगीत महोत्सवाला परवाणगी नाकारल्याचे स्पष्ट केले आहे.कळंबोली शहरात रोडपाली येथे नवी मुंबई पोलिस आयुक्तालायला लागून सिडकोचे मैदान आहे. मैदानाच्या चारही बाजुला नागरी वस्ती आहे. या मैदानावर लाईव्ह म्युझिक फेस्टिव्हल भरविण्यात येणार असल्याची जाहिरात समाजमाध्यमावर काही दिवसांपासून सुरू आहे.

गोरेगाव नेस्को सेंटरमध्ये ड्रग्जच्या सेवनामुळे दोन तरूणांचा मृत्यु झाल्याची घटना घडली होती. हा कार्यक्रम देखील कळंबोली होवू घातलेल्या कार्यक्रमासारखा होता. खारघरमध्ये झालेल्या कार्यक्रमात देखील मद्यविक्रीस परवानगी देण्यात आली होती. यावेळी देखील मद्यसेवन आणि ड्रग्स मुळे अनेक तरुणांना दवाखान्यात दाखल करावे लागले होते.या पार्श्वभूमीवर होणाऱ्या कार्यक्रमाला कळंबोलीतील जागरूक नागरिकांनी विरोध केला होता. या कार्यक्रमाला विरोध दर्शविल्याने सिडकोने देखील स्पष्ट भूमिका घेत परवानगी नाकारल्याने नागरिनी समाधान व्यक्त केला आहे.

### पोलिसांच्या भूमिकेचे स्वागत

कळंबोली पोलिसांनी यासंदर्भात ठोस भूमिका घेत कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कोते यांनी सिडकोला दिलेल्या अभिप्राय सिडकोला दिला होता.नागरिकांचा होणारा विरोध देखील पोलीस प्रशासनाने आपल्या अभिप्रायामध्ये नमूद केला होता.त्यामुळे पोलिसांच्या भूमिकेचे स्वागत नागरिक करीत आहेत.

# रायगडच्या हापूसचा अमेरिकेत डंका

## ■ बागायतदार डॉ. संदेश पाटील यांच्या बागेतील आंबा साता समुद्रापार





**पाली : प्रतिनिधी**

आंबा हा फळांचा राजा म्हणून जगभर ओळखला जातो. कोकणातील हापूस आंबा आपल्या चव, सुगंध आणि रंगामुळे विशेष प्रसिद्ध आहे. मात्र यंदा हाच हापूस अनेक संकटांना सामोरा जात आहे. बदलते हवामान, अवकाळी पाऊस, वाढता ऊष्मा, कीड-रोगांचा प्रादुर्भाव आणि बाजारातील भेसळयुक्त आंबे या सगळ्यांचा फटका बागायतदारांना बसत आहे.

मदतीचा अभाव आणि उत्पादन घट यामुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत. अशा परिस्थितीत "मायबाप जनतेने थेट शेतकऱ्यांकडून आंबे खरेदी करून त्यांना आधार द्यावा," असे आवाहन बागायतदार करत आहेत. अनेक आव्हान उभी ठाकली तरी या आव्हानांना पेलत रायगडच्या हापूसचा अमेरिकेत डंका वाजत आहे , जांभूळपाडा येथील आंबा बागायतदार डॉ. संदेश पाटील यांच्या बागेतील आंबा सातासमुद्रापार पोहचला असल्याचे खुद्द डॉ. संदेश पाटील यांनी सांगितले. कोकणातील हापूस हा केवळ फळ नाही तर संपूर्ण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. मात्र सध्याच्या संकटामुळे हा कणा डळमळीत झाला आहे.

तज्ज्ञांच्या मते, हवामान बदलामुळे आंबा पिकाच्या फुलोऱ्याचा कालावधी आणि फळधारणेवर थेट परिणाम होत आहे. तापमानातील अचानक बदल आणि आर्द्रतेतील चढ-उतार यामुळे मोहोर टिकत नाही. दरम्यान, निर्यात बाजारावरही परिणाम होत असल्याचे चित्र आहे. दर्जेदार उत्पादन कमी झाल्यामुळे परदेशात जाणाऱ्या हापूसच्या प्रमाणात घट होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. याचा थेट फटका शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर बसू शकतो. असे बागायतदार डॉ. पाटील म्हणाले.

भारत आणि महाराष्ट्र आंबा उत्पादनात अग्रस्थानी आहेत. महाराष्ट्रात सुमारे ३.५७ लाख हेक्टर क्षेत्र आंबा लागवडीखाली असून, कोकणातील हापूस आंब्याची निर्यात मोठ्या प्रमाणात होते. यामुळे शेतकऱ्यांना चांगला आर्थिक फायदा मिळतो. रायगड जिल्ह्यात ५६ ते ६० हजार आंबा बागायतदार आहेत, तर संपूर्ण कोकणात ही संख्या साडेचार लाखांच्या घरात आहे.

यंदा परिस्थिती वेगळी आहे. बदलत्या हवामानामुळे आंब्याचा मोहोर मोठ्या प्रमाणात कुजला. मावा आणि तुडतुडे यांसारख्या किडींचा प्रादुर्भाव वाढला. बागायतदारांनी महागडी औषधे फवारूनही अपेक्षित फळधारणा झाली नाही. यावर्षी केवळ १५ ते २० टक्के उत्पन्न मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. उत्पादन घटल्यामुळे खर्च वाढला असून नफा मिळेल की तोटा, याची चिंता शेतकऱ्यांना सतावत आहे.

### बदलते हवामान ठरतेय आव्हान

***जर वेळेत उपाययोजना केल्या नाहीत, तर "फळांचा राजा" टिकवणे कठीण होऊ शकते. म्हणूनच ग्राहक, शासन आणि समाज या तिघांनीही पुढे येऊन आंबा बागायतदारांना आधार देणे ही काळाची गरज बनली आहे. यंदाच्या हंगामात केवळ हवामानच नव्हे तर उत्पादन खर्चातही मोठी वाढ झाली आहे. खतं, औषधं, मजुरी आणि वाहतूक खर्च वाढल्यामुळे आंबा बागायतदारांचे गणित बिघडले आहे. एका झाडामागे होणारा खर्च वाढला असतानाही उत्पादन मात्र घटले आहे.***

एकीकडे नैसर्गिक संकटे आणि दुसरीकडे बाजारातील फसवणूक अशा दुहेरी संकटात सापडलेला कोकणातील आंबा बागायतदार आजही तग धरून आहे. आता गरज आहे ती ग्राहकांनी सजग होऊन थेट शेतकऱ्यांकडून खरेदी करण्याची, जेणेकरून "फळांचा राजा" आणि तो पिकवणारा "शेतकरी" दोघेही टिकून राहतील, असे संदेश पाटील म्हणालेत. बाजारात कर्नाटकातून येणाऱ्या भेसळयुक्त आंब्यांची विक्री हापूसच्या नावाखाली होत असल्याचे प्रकार समोर आले आहेत. त्यामुळे ग्राहकांचा विश्वास ढासळत आहे. यावर पर्याय म्हणून अनेक ग्राहक आता थेट बागेतून आंबे खरेदी करण्यास प्राधान्य देत आहेत. "यंदा हवामानामुळे मोठं नुकसान झालं आहे. मोहोर टिकला नाही, खर्च मात्र वाढला. बाजारात भेसळयुक्त आंबे येत असल्याने आमच्या खऱ्या हापूसला योग्य भाव मिळत नाही. त्यामुळे ग्राहकांनी थेट बागायतदारांकडून आंबे खरेदी करून आम्हाला आधार द्यावा."असे आवाहन आंबा बागायतदार डॉ. संदेश पाटील यांनी केले आहे, तर आंबा बागायतीत नफा टिकवायचा असेल तर खर्च कमी करावा हाच पर्यायी सल्ला संदेश पाटील यांनी आंबा बागायतदार व शेतकऱ्यांना दिला आहे.

## पोलादपूर तालुक्यात पुन्हा होणार नद्या-उपनद्यांतील गाळ उपसा



**पोलादपूर : प्रतिनिधी**

२०२१पूर्वी ज्याप्रमाणे पोलादपूर तालुक्यातील नद्या व उपनद्यांतील गाळ उपसा करून सावित्री नदीपात्रामुळे महाड शहरातील पूरस्थिती पुन्हा उदभवू नये यासाठी गाळ उपसा मोहिमेची कोटयवधींच्या निविदा प्रक्रिया महाड तालुक्याप्रमाणेच पोलादपूर तालुक्यातही सुरू झाल्या आहेत, मात्र या निविदांच्या अटी-शर्तीमध्ये उल्लेख करण्यात आला आहे.

पोलादपूर तालुक्यात सावित्री, ढवळी, घोडवणी, कामथी आणि चोळई या नद्यांच्या तसेच नद्यांच्या उपनद्यांच्या पात्रांमधील गाळ उपसा करण्याकामी रायगड पाटबंधारे विभागाच्या कोलाड येथील कार्यकारी अभियंता यांच्यामार्फत पोलादपूर तालुक्यातील वेगवेगळया ३७ ठिकाणी निविदा प्रक्रिया सुरू झाली आहे.

महाड शहरात पूर संरक्षण व नियंत्रण कामांतर्गत सावित्री नदी व उपनद्या तसेच स्थानिक नाले या पात्रांमधून उल्लेखित केलेल्या ठिकाणी गाळ, दगड, गोटे काढण्याचे काम या निविदांद्वारे दिले जात आहे. पोलादपूर तालुक्यातील गाळ, दगड, गोटा व रेजगा काढतांना जे.सी.बी., पोकलेन व मनुष्यबळ वापरण्याची मुभा असून बालकामगारांचा समावेश करण्यात बंदी करण्यात आली आहे.

गाळउपसा कामाच्या प्रगतीचा दर आठ दिवसांनी आढावा घेण्यात येईल व प्रगती समाधानकारक नसल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता कामाचे आदेश रद्द करण्यात येतील, असा स्पष्ट उल्लेख निविदेमध्ये असल्याने तसेच कोणत्याही नुकसानीस रायगड पाटबंधारे विभागाचे कोलाड येथील कार्यकारी अभियंता हे कार्यालय जबाबदार राहणार नसल्याचा उल्लेख याकामी आहे.



**चौक : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती भीमशक्ती नवतरुण मंडळाने मोठ्या उत्साहात साजरी केली.**

## महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीची रायगड जिल्हा परिषदेत सदिच्छा भेट

**रोहा : प्रतिनिधी**

शासनमान्यता प्राप्त शिक्षक संघटना महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती जिल्हा शाखा रायगडच्या वतीने गुरुवार, १६ एप्रिल रोजी रायगड जिल्हा परिषदेचे नवनिर्वाचित अध्यक्ष मंगेश वाकडीकर, उपाध्यक्ष मधुकर पाटील, शिक्षण सभापती चंद्रकांत कळंबे यांची सदिच्छा भेट घेण्यात आली.

यावेळी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे शिक्षक नेते मारुती कळंबे, राज्य कार्यालयीन चिटणीस किशोर पाटील, प्रतिनिधी अनिल नागोठकर, कोकण विभागीय उपाध्यक्ष शायालिक जामघरे, महिला आघाडी प्रमुख विद्या रोहेकर, जिल्हाध्यक्ष विजय येलवे, जिल्हा सरचिटणीस तानाजी गवारी, उपाध्यक्ष यशवंत मोंढे, तळा तालुकाध्यक्ष सुनील बैकर, रोहा तालुकाध्यक्ष ब्रिजेश भादेकर, उपाध्यक्ष संतोष खलापकर, प्रसिद्धीप्रमुख संतोष वेटकोळी आदी पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी विविध विषयांवर सांगोपांग चर्चा करण्यात आली.



# वावोशी येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान शिबिर



**चौक : प्रतिनिधी**

शेतकरी आणि सर्वसामान्य जनतेच्या हिताच्या योजना महायुतीचे शासन राबवीत असून त्याचा लाभ सर्व सामान्य जनतेला होत आहे, हेच खरे समाधान शिबिर असल्याचे खालापूर पंचायत समितीचे उपसभापती भाई शिंदे यांनी सांगितले.

राज्य सरकारने आयोजित केलेल्या महाराजस्व समाधान शिबिर अभियानची त्वरीत अंमलबजावणी करणे करता वावोशी महसूल मंडळ अधिकारी सचिन वाघ व त्यांचे सर्व ग्राम महसूल अधिकारी यांनी वावोशी येथे आयोजित केलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरात विविध प्रकारचे दाखले वाटप व शासकीय योजना माहिती कार्यक्रमात बोलत होते. तत्पूर्वी कार्यक्रमाचे उद्घाटन तहसीलदार अभय चव्हाण, जिल्हा परिषद सदस्य सौ. रेश्मा पाटील, निवासी नायब तहसीलदार सुधाकर राठोड, नायब तहसीलदार विकास पवार, मिलिंद तिऱ्हेकर यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस व दीप प्रज्वलन करून करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज हे प्रत्यक शेतकरी, नागरिक यांच्या ठिकाणी भेट देऊन तेथील लोकांच्या समस्या सोडवून समाधान करीत होते,आणि न्याय देत होते, त्याच प्रमाणे हे शिबिर प्रत्यक्ष लाभार्थी यांच्या पर्यंत पोहचत आहे, असे खालापूर तहसीलदार अभय चव्हाण यांनी सांगितले. आपल्या प्रास्ताविक मंडल अधिकारी सचिन वाघ यांनी समाधान शिबिराचे महत्व आणि त्याचा लाभ या विषयी माहिती दिली.या समाधान शिबिरात प्रशासकीय विभागाकडील अधिकारी यांनी आपापल्या विभागाकडील योजनांची माहिती सदर अभियानात दिली. प्रत्येक विभागाने स्टॉल लावून शासनाच्या विविध प्रकारचे दाखले व योजना नागरिकांना लाभ देण्याकरिता सोय उपलब्ध करून देण्यात आली होती. यावेळी उप अधिक्षक भूमी अभिलेख खालापूर यांनी तयार केलेल्या वावोशी या महसूल गावठाण नकाशा व त्याच्या सनदा ग्राम पंचायत यांच्या कडे सुपूर्द केल्या.प्रतिनिधी स्वरूपात वेगवेगळ्या लाभधारकांना त्या त्या योजनेचे अनुदान कागद पत्र देण्यात आले. जातीचे प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवाशी दाखला, शैक्षणिक योजना व त्याचे दाखले,

प्रलंबित असलेले फेरफार निकाली काढणे,७/१२ मधील चुकांची दुरुस्ती,डिजिटल स्वाक्षरीचे सातबार वाटप,नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र, अकृषिक तरतुदींबाबत मार्गदर्शन व सुधारणा (४२ ते ४७) कलम सनद प्रक्रियेची माहिती, सामाजिक अर्थसहाय्य योजना लाभ मंजुरी,तुकडेबंदी कायदा सुधारणा,पानंद रस्ता, सर्वांसाठी घरे पट्टेवाटप, ॲग्रीस्टॅग नोंदणी,पी.एम. किसान नोंदणी, कमी जास्त पत्रक दप्तर अद्यावत करणे.संपर्क व प्रात्यक्षिक उपक्रम राबविण्यात आले व माहिती देण्यात आली सदर कार्यक्रमाला शिवसेना नेते विजय पाटील,सहाय्यक गटविकास अधिकारी प्रदीप कांबळे, भूमी अभिलेख चे समाधान पाटील,उत्तम केंद्रे, टाटा स्टील फाऊंडेशन चे भावेश रावल, मंडळ अधिकारी माणिक सानप, मंडळ अधिकारी भरत सावंत,अमोल वाघ, इशिका शेलार यांच्यासह मंडळातील सरपंच,सदस्य, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.महसूल अधिकारी प्रियांका वांगी, गजानन गिऱ्हे, स्वप्नगंधा पाटील, उमाकांत गुरुमूर्ती, विकास गायकवाड, सचिन मिसळ, सर्व कोतवाल, अमोल वाघ,यांनी विशेष परिश्रम घेतले.सेतू सुविधा केंद्र,आपले सरकार सेवा केंद्र, आधार कार्ड केंद्र चालक ,इतर कृषी विभागातील कर्मचारी अधिकारी उपस्थित होते. सदर अभियानात वावोशी मंडळातील नागरिकांनी विविध प्रकारच्या योजनांचा लाभ घेतला अभियानात लोकप्रतिनिधींनी तात्काळ मिळालेल्या सेवामुळे प्रशासनाच्या या योजनांचे विशेष कौतुक केले. अनेक आदिवासी विद्यार्थ्यांनी या अभियानात शैक्षणिक सुविधा उपलब्ध झाल्याने समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन जगदीश मरागजे व आभारप्रदर्शन सचिन वाघ यांनी केले.महाराष्ट्र गीताने कार्यक्रमाची शोभा वाढवली, कार्यक्रमाच्या आयोजनाचे अनेकांनी कौतुक केले.

## वरसे केंद्रात स्वामी समर्थ पुण्यतिथी



**रोहा : प्रतिनिधी**

अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ सेवा व अध्यात्मिक विकास मार्गाचा स्वामी पुण्यतिथी सप्ताह सर्वत्र झाला. रोहा तालुक्यातील वरसे केंद्रातसुद्धा स्वामी पुण्यतिथी सप्ताह अतिशय सेवापूर्वक व भावपूर्ण वातावरणात झाला.

एक आठवड्यापासून हजारो सेवेकरी स्वामींचे दर्शन घेण्यासाठी व आरतीस वरसे केंद्रात येत होते. त्याचप्रमाणे प्रहर सेवा, विविध प्रकारचे यज्ञ आणि पारायण सेवा यामध्ये सहभागी झाले होते. आठवडाभर पहाटेपासूनच सेवा केंद्रामध्ये दैनंदिन नियोजित सेवेची लगबग असायची.सकाळी ८ ते रात्री. ८ पर्यंत महिला सेवेकरी प्रहरे मध्ये सहभागी होयच्या त्यानंतर रात्री ८ ते सकाळी ८ पर्यंत पुरुष सेवेकरी प्रहर सेवा घेऊन स्वामींच्या चरणी आपली सेवा रुजू करत असत.सकाळी स्वामींच्या मूर्तीचे षोडशोपचारे पुजन आणि शिवलिंगावर अभिषेक झाल्यावर भूपाळी आरती नंतर गुरुचरित्र सामुदाईक पारायण वाचन होत असे. श्री नवनाथ पारायण, श्रीमद् भागवत पारायण, श्रीपाद श्रीवल्लभ चरित्र वाचन, आदिमायेचा जागर अशा विविध सेवा सेवेकऱ्यांचे माध्यमातून राष्ट्र कल्याणार्थ, विश्व कल्याणार्थ पार पडल्या. सांगतेच्या दिवशी जोगव्याच्या कार्यक्रमाने भाविकांमध्ये भक्तीचे वातावरण निर्माण झाले. या जोगव्याच्या कार्यक्रमात सर्व बालसंस्कार च्या बाल सेवेकऱ्यांनी हौशीने भाग घेतला.सप्ताह काळात अनेक पुरुष-महिला-बाल सेवकऱ्यांनी आपली सेवा स्वामींच्या चरणी रुजु केली. सर्व सेवेकऱ्यांच्या सहकार्यामुळेच सप्ताह आनंदमय वातारणात पार पडला. सप्ताह काळात सुप्रसिद्ध आयुर्वेदाचार्य शिरीष कुमार पेंडसे, नागपुर येथील सुप्रसिद्ध दंत चिकित्सक डॉ. अवनी आशिष केंद्रे, अलिबाग येथील सेवा केंद्राचे प्रतिनिधी, सेवा मार्गाचे कोकण प्रशासकीय प्रतिनिधी यांनी विविध विषयांवर तसेच मार्गाच्या १८ विभागांवर मार्गदर्शन केले.सप्ताह काळात रोहा शहर नगराध्यक्ष वनश्री शेडगे, नगरसेविका नीता हजारे, गटनेते महेंद्र गुजर, अमित मोहिते यांनी उपस्थिती दर्शवली.

पोलीस विभागाकडुन सायबर क्राईम या ज्वलंत विषयावर सेवा मार्गाचे प्रतिनिधीनी सेवेकऱ्यांना मार्गदर्शन करून जनजागृती केली उपस्थित असलेल्या सर्व स्वामी सेवकऱ्यांनी महाप्रसादाचा लाभ घेतला आणि कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# चोळई सावित्री संगमावरील डम्पिंग ग्राऊंडविरोधात आंदोलन



**पोलादपूर : प्रतिनिधी**

आधी पोलादपूर स्मशानभूमीलगत आणि आता महाबळेश्वर रस्त्यालगतच्या चोळई सावित्री संगमावरील डम्पिंग ग्राऊंड तयार झाले असून त्यामुळे मोकाट गायी-गुरे यांच्या पोटात प्लास्टीकचा कचरा जाऊन पोटं मोठी झाली आहेत, तर पावसाळ्यात हा कचरा थेट सावित्री नदीपात्रामध्ये मिसळला जाऊन नदीपात्रातील पिण्याच्या पाण्याच्या योजनांतून प्रदुषित पाणीपुरवठा नळाद्वारे होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. याविरोधात संस्थापक राज पार्टे यांच्या 'आमची माती आमची माणसं' संघटनेने छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा या डम्पिंग ग्राऊंडवर उभारण्याचे आंदोलन हाती घेतले.

कचराप्रश्नी टोकाची भूमिका नको, अशी विनंती उपस्थित शिवप्रेमींनी केल्यानंतर पार्टे यांनी सर्वांसोबत डम्पिंग ग्राऊंडवर जाऊन नगरपंचायत जनतेच्या आरोग्यासोबत कसा खेळ करीत आहे, याबाबत लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला.

पोलादपूर स्मशानाजवळील सावित्री नदीपात्रात आणि सद्यस्थितीत दि लेप्रसी मिशन हॉस्पिटलसमोरील चोळई आणि सावित्री नदीच्या संगमाजवळील दगडगोटयांमध्ये डम्पिंग ग्राऊंडसदृश्य कचराप्रवण क्षेत्र तयार झाले आहे. दरवर्षी ७९ लक्ष रुपयांची कचरा संकलन आणि घन व द्रव कचरा व्यवस्थापनासाठी निविदा काढून ठेकेदारांमार्फत संकलित करण्यात आलेल्या कचऱ्याची नियोजनबध्द विल्हेवाट करण्यासंदर्भातील प्रयत्न अपुरे असल्याने या कचराप्रवण क्षेत्रामध्ये चिकनसेंटरमधील जैवकचरा, शहरातील प्लास्टीक पिशव्या व बाटल्यांचा कचरा, वैद्यकीय क्षेत्रातील आणि हॉटेल व्यावसायिकांसह घराघरांतील ओला सुका कचरा याठिकाणी ठेकेदाराकडून टाकला जात आहे. यामुळे मोकाट जनावरांवर होणाऱ्या दुष्परिणामांसह नागरी जीवनावरदेखील मोठया प्रमाणावर वायू प्रदूषण व जलप्रदूषणाची लक्षणं दिसून येत आहेत.

संस्थापक राज पार्टे यांच्या 'आमची माती आमची माणसं' संघटनेने छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा या डम्पिंग ग्राऊंड वर उभारण्याचे अभिनव आंदोलन हाती घेतल्यानंतर विरोधी गटाचे नगरसेवक दिलीप भागवत, स्वप्नील भुवड आणि श्रावणी शहा तसेच शिवसेनेचे विभागप्रमुख लक्ष्मण मोरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अनिल मालुसरे व भाजपचे शहरप्रमुख महेश निकम यांनी आंदोलनस्थळी उपस्थित राहून संघटनेसोबत सहभागी होत छ.शिवाजी महाराजांचा पुतळा या डम्पिंग ग्राऊंडवर स्थानापन्न न करता सर्व प्रकारच्या आंदोलनामध्ये शहरवासीयांसह तालुक्यातील जनतेसोबत असल्याचे सांगितले.

यानंतर 'आमची माती आमची माणसं' संघटनेचे संस्थापक राज पार्टे यांनी स्वतः कचऱ्याची घंटागाडी चालवित नगरपंचायत पोलादपूरच्या प्रांगणात आणली. यावेळी उपनगराध्यक्ष मनोज प्रजापती यांनी आंदोलकांना सामोरे जाऊन लवकरच पोलादपूर नगरपंचायतीच्या कचरा व्यवस्थापनासाठी डम्पिंग ग्राऊंड रानबाजिरे धरणालगतच्या मोकळया जमिनीवर उपलब्ध होण्यासाठी महाड एमआयडीसीला विनंती करण्यात आल्याचे सांगून केवळ जमिनीची निश्चिती करण्याची प्रकिया शिल्लक असल्याचे सांगून समाधान केले.

# हैदराबादची चेन्नईवर मात

## अभिषेक, क्लासेन, मलिंगा चमकले

**हैदराबाद : वृत्तसंस्था**



अभिषेक शर्मा आणि हेन्री क्लासेन यांच्या दमदार अर्धशतकी खेळीनंतर गोलंदाजीत एशान मलिंगाचा भेदक मारा आणि अखेरच्या षटकात प्रफुल हिंगेने अचूक टप्प्यावर केलेल्या गोलंदाजीच्या जोरावर सनरायझर्स हैदराबादने घरच्या मैदानात १० धावांनी विजय नोंदवला. यामुळे चेन्नई सुपर किंग्सच्या मर्यादा पुन्हा उघड झाल्या.

चेन्नईचा कर्णधार ऋतुराज गायकवाडने नाणेफेक जिंकून पहिल्यांदा गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. अभिषेक शर्माने २२ चेंडूत सहा चौकार आणि चार षटकारांच्या मदतीने केलेल्या ५९ धावा आणि हेन्री क्लासेन याने ३९ चेंडूत सहा चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने केलेल्या ५९ धावांच्या खेळीच्या जोरावर हैदराबादच्या संघाने निर्धारित २० षटकात ९ बाद १९४ धावा केल्या. गोलंदाजीत चेन्नईकडून अंशुल कंबोज आणि जेमी ओव्हरटन यांनी प्रत्येकी तीन विकेट्स घेतल्या. याशिवाय मुकेश चौधरी याने दोन, तर गुरजपनीत सिंग याने एक विकेट आपल्या खात्यात जमा केली.

सनरायझर्स हैदराबादच्या संघाने दिलेल्या धावांचा पाठलाग करताना संजू सॅमसन याने प्रफुल हिंगेच्या गोलंदाजीवर षटकारासह खाते उघडले, पण तो फक्त सात धावा करून माघारी फिरला. त्यानंतर ऋतुराज गायकवाड आणि आयुष म्हात्रे जोडी जमली. १८ वर्षीय आयुषने १३ चेंडूत पाच चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने ३० धावांची दमदार खेळी केली. दुखापतीने त्रस्त असताना मैदान न सोडता त्याने खेळण्याचा निर्णय घेतला, पण तो पुढच्याच चेंडूवर बाद झाला. मग ऋतुराज गायकवाडने १३ चेंडूत १९ धावा करत विकेट फेकली. मॅथ्यू शॉर्टने ३० चेंडूत ३४ धावांची खेळी केली. सरफराज खान १९ चेंडूत २५ धावा केल्या. या दोघांनाही एशान मलिंगानं तंबूचा रस्ता दाखवला. शिवांग कुमारने डेवॉल्ड ब्रेविसला खातेही उघडू दिले नाही.

अखेरच्या षटकात शिवम दुबे आणि जेमी ओव्हरटन यांच्यावर संघाला विजय मिळवून देण्याची जबाबदारी होती, पण साकिब हुसेन याने शिवमची विकेट घेत चेन्नई सुपर किंग्सला बॅकफूटवर ढकलले. चेन्नईच्या संघाला अखेरच्या षटकात १८ धावांची गरज होती. ईशान किशन याने शेवटच्या षटकाची जबाबदारी पहिल्या तीन षटकात ५४ धावा खर्च करून महागडा ठरलेल्या प्रफुल हिंगेकडे सोपवली. त्यानेही अचूक टप्प्यावर गोलंदाजी करत कर्णधाराचा विश्वास सार्थ ठरवला. या षटकात त्याने जेमी ओव्हरटनच्या रूपात एक विकेटही आपल्या खात्यात जमा केली. एशान मलिंगा हा सनरायझर्सच्या ताफ्यातून सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला. त्याने २९ धावा खर्च करत तीन विकेट्स घेतल्या.


# अभिषेक शर्माची तडाखेबंद अर्धशतकी खेळी

## रैना, ईशानला मागे टाकत वैभव सूर्यवंशीची बरोबरी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

सनरायझर्स हैदराबादचा सलामीवीर अभिषेक शर्माने चेन्नई सुपर किंग्सविरुद्धच्या सामन्यात अवघ्या १५ चेंडूत अर्धशतकाला गवसणी घातली. याआधी २०२४च्या हंगामात त्याने मुंबई इंडियन्सविरुद्ध १६ चेंडूत अर्धशतक साजरे केले होते.

अभिषेकच्या आधी यंदाच्या हंगामात वैभव सूर्यवंशी याने दोन वेळा, तर २०२४च्या हंगामात जेक फ्रेसर-मॅकगर्क याने दोन वेळा १५ चेंडूत अर्धशतक साजरे केल्याची नोंद आहे. याशिवाय युसूफ पठाण (२०१४), सुनील नरेन (२०१७), निकोलस पूरन (२०२३) यांनी आयपीएलमध्ये अशी इनिंग खेळली होते.



अभिषेकने यावेळी मुंबईविरुद्ध २०२४मध्ये केलेल्या आपल्या जलद अर्धशतकासह सुरेश रैना (२०१४), ईशान किशन (२०२१), ट्रॅविस हेड (२०२४), प्रियांश आर्य (२०२६) यांचा १६ चेंडूत अर्धशतक झळकावण्याचा पराक्रम केला.

### वीरेंद्र सेहवागचा विक्रम मोडला

अभिषेक शर्मा आता आयपीएलच्या इतिहासात सर्वात कमी चेंडूंमध्ये दोन हजार धावा पूर्ण करणारा भारतीय खेळाडू ठरला आहे. अभिषेकने अवघ्या ११९३ चेंडूंमध्ये हा पराक्रम केला. अभिषेकने वीरेंद्र सेहवागचा विक्रम मोडला. सेहवागने १२११ चेंडूंमध्ये दोन हजार आयपीएल धावा पूर्ण केल्या होत्या. जागतिक पातळीवर या यादीत आंद्रे रसेल अव्वल क्रमांकावर (११२० चेंडू) आहे.

## राज्यस्तरीय पुरुष व महिला गट कबड्डी स्पर्धा

# स्वराज्य स्पोर्ट्स आणि श्रीराम क्रीडा विश्वस्त संघ विजेतेपदाचे मानकरी

**ठाणे : प्रतिनिधी**




महिलांत स्वराज्य स्पोर्ट्स आणि पुरुषांत श्रीराम क्रीडा विश्वस्त यांनी श्री मावळी मंडळाने आयोजित केलेल्या ७३व्या राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत अंतिम विजेतेपद मिळविले. स्वराज्य स्पोर्ट्सची याशिका पुजारी, तर श्रीराम क्रीडा विश्वस्तचा तुषार शिंदे स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू ठरले.

ठाणे चरई येथील श्री मावळी मंडळाच्या भव्य पटांगणावर महिलांच्या अत्यंत चुरशीने खेळला गेलेल्या अंतिम सामन्यात उपनगरच्या स्वराज्य स्पोर्ट्सने पूर्वार्धातील १३-१७ अशा पिछाडीवरून पालघर (विरार)च्या विवेक स्पोर्ट्सचा प्रतिकार ३७-३३ असा मोडून काढत श्री मावळी मंडळ चषक व रोख ५१ हजार रुपये आपल्याकडे खेचून आणले. उपविजेत्या विवेकला रोख ३१ हजार रु. व चषकावर समाधान मानावे लागले. हरजीत, स्वीटी, सौंदर्या यांच्या चतुरस्त्र खेळाच्या जोरावर विवेक स्पोर्ट्सने पूर्वार्धात लोण देत चार गुणांची आघाडी मिळविली होती, पण उत्तरार्धात त्यांना आपल्या खेळात सातत्य राखणे जमले नाही. दुसरीकडे स्वराज्य स्पोर्ट्सच्या याशिका पुजारी, समृद्धी मोहिते यांनी आपला खेळ गतीमान करीत चढाईत भराभर गुण घेत लोणची परतफेड केली. त्यांना प्रतिक्षा तांडेलने उत्कृष्ट पकडी करीत छान साथ दिली. म्हणूनच शेवटच्या क्षणापर्यंत श्वास रोखून धरणाऱ्या या सामन्यात स्वराज्यला सरशी साधता आली.

पुरुषांच्या अंतिम सामन्यात मुंबईच्या श्रीराम क्रीडा विश्वस्त मंडळाने ठाण्याच्या ग्रीफिन्स जिमचा ३६-३० असा पराभव करीत श्री मावळी मंडळ चषक व रोख ५१ हजार रुपये आपल्या खात्यात जमा केले. उपविजेत्या ग्रीफिन्स जिमला चषक व रोख ३१ हजार रुपयांवर समाधान मानावे लागले. आक्रमक सुरुवात करीत पहिला लोण देत श्रीराम संघाने पहिल्या डावात २०-१२ अशी आघाडी घेत विजयाच्या दिशेने पहिले पाऊल टाकले. दुसऱ्या डावात आणखी एक लोण देत आपल्या विजयावर शिक्कामोर्तब केले. दुसऱ्या डावात मात्र ग्रीफिन्सने आपल्या खेळाची गती वाढवीत लोणची परतफेड करीत गुणा मधील फरक कमी केला, पण संघाला विजयी करण्यात त्यांचा खेळ कमी पडला. तुषार शिंदे, अंकुश पारले यांच्या संयमी व धूर्त चढाया त्यांना अमित सिंग, आदित्य पारले यांची मिळालेली बचावाची साथ यामुळे हा विजय शक्य झाला. सुरज धुंदले, मनीष धनावडे, वेदान्त धामले, आदित्य पिलाणे यांनी दुसऱ्या डावात आपला खेळ उंचावत कडवी लढत दिली.

स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू स्वराज्य स्पोर्ट्सची याशिका पुजारी, आणि श्रीराम क्रीडा विश्वस्तचा तुषार शिंदे यांना प्रत्येकी रोख पाच हजार रुपये देऊन गौरविण्यात आले. महिलांत विवेकची स्वीटी आणि स्वराज्यची समृद्धी मोहिते यांना अनुक्रमे स्पर्धेतील उत्कृष्ट चढाई आणि पकडीचे खेळाडू म्हणून घोषित करण्यात आले. पुरुषांत ग्रीफिन्सचा मनीष धनावडे आणि श्रीरामचा अमित सिंग यांना अनुक्रमे स्पर्धेतील उत्कृष्ट चढाई आणि पकडीचे खेळाडू म्हणून जाहीर करण्यात आले. या चारही खेळाडूंना प्रत्येकी रोख तीन हजार रुपये देऊन गौरविण्यात आले.

स्पर्धेचे पारितोषिक वितरण ठाणे जिल्हा कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष व उपमहापौर कृष्णा पाटील, मंडळाचे विश्वस्त जुगलकिशोर मुंदरा, प्रभाकर सुर्वे, कृष्णा डोंगरे, पॅट्रिक फर्नांडिस, रवींद्र आंग्रे, सुधाकर मोरे, केशव मुकणे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत झाले.

# दिल्लीचा आरसीबीवर थरारक विजय

**बंगळुरू : वृत्तसंस्था**



लोकेश राहुल आणि ट्रिस्टन स्टब्सच्या दमदार अर्धशतकानंतर डेविड मिलरच्या किलर फिनिशिंग टचच्या जोरावर दिल्ली कॅपिटल्सच्या संघाने रोमहर्षक सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या संघाला सहा विकेट्स राखून पराभूत केले. बंगळुरू येथील एम चिन्नास्वामी स्टेडियमवर रंगलेल्या सामन्यात पहिल्यांदा फलंदाजी करताना फिल सॉल्टच्या अर्धशतकाच्या जोरावर आरसीबीने पाहुण्या दिल्ली कॅपिटल्ससमोर १७६ धावांचे टार्गेट सेट केले होते.

आरसीबीने दिलेल्या १७६ धावांचा पाठलाग करताना दिल्ली कॅपिटल्सची सुरुवात खराब झाली. भुवनेश्वर कुमारने पथुम निसंका याला अवघ्या एका धावेवर तंबूचा रस्ता दाखवला. इम्पॅक्ट प्लेयरच्या रूपात आलेला करून नायर पाच चेंडूत पाच धावा करून माघारी फिरला. समीर रिझवीही अवघ्या दोन धावांवर बाद झाला. भुवीच्या भेदक माऱ्यासमोर दिल्लीची अवस्था ३ बाद १८ अशी बिकट झाली होती.

संघ अडचणीत असताना लोकेश राहुलने ट्रिस्टन स्टब्सच्या साथीने डावाला आकार दिला. या दोघांनी चौथ्या विकेटसाठी ४४ चेंडूत ६९ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी रचली. लोकेश राहुल लयीत दिसत असताना क्रुणाल पांड्याच्या गोलंदाजीवर विराट कोहलीने ५७ धावांवर त्याच्या खेळीला ब्रेक लावला.

लोकेश राहुल सामना सेट करून परतल्यावर स्टब्सने कर्णधार अक्षर पटेलच्या साथीने ३४ चेंडूत ४७ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी रचली. स्नायू दुखापतीमुळे अक्षर रिटायर्ड हर्ट होऊन परतल्यावर डेविड मिलर मैदानात उतरला. त्याने स्टब्सच्या साथीने २४ चेंडूत ४५ धावांची भागीदारी रचत संघाला विजय मिळवून देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. स्टब्सने ४७ चेंडूत चार चौकार आणि एका षटकारांच्या मदतीने ६० धावांची नाबाद खेळी केली.

अखेरच्या षटकात १५ धावांची गरज असताना सामना पुन्हा बंगळुरूच्या बाजूने फिरला होता, पण डेविड मिलरने दोन षटकार मारत संघाचा विजय निश्चित केला. मिलरने फक्त १० चेंडूत २२ धावा कुटल्या. आरसीबीकडून भुवीने सर्वाधिक तीन, तर क्रुणाल पांड्याने एक विकेट घेतली.

तत्पूर्वी पहिल्यादा फलंदाजी करताना फिल सॉल्ट आणि विराट कोहलीने संघाला चांगली सुरुवात करुन दिली, पण विराट कोहली १३ चेंडूत १९ धावा करू माघारी फिरला. देवदत्त पडिक्कलही चांगली सुरुवात मिळाल्यावर १८ धावांवरच बाद झाला. कर्णधार रजत पाटीदारही या सामन्यात फक्त चार धावांची भर घालू शकला. फिल सॉल्टने ३८ चेंडूत केलेल्या ६३ धावा आणि टिम डेविडच्या १७ चेंडूतील २६ धावांच्या जोरावर बंगळुरूच्या संघाने निर्धारित २० षटकात आठ बाद १७५ धावा केल्या होत्या. दिल्लीच्या संघाकडून लुंगी एनिग्डी, कुलदीप यादव आणि अक्षर पटेलने प्रत्येकी दोन, तर मुकेश कुमारने एक विकेट घेतली.

# विराटने टिपला शानदार झेल



**बंगळुरू : वृत्तसंस्था**

बंगळुरूच्या एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर दिल्ली कॅपिटल्सविरुद्धच्या सामन्यात १७५ धावांचा बचाव करताना फिल सॉल्ट आणि जितेश शर्मा यांनी सर्वोत्तम फिल्डिंगचा नजराणा पेश केला. पॉवर प्लेमध्ये या दोन भिडूंनी अफलातून झेल टिपत मैफील लुटल्यावर विराट कोहलीही पिक्चरमध्ये आला. केएल राहुलच्या क्लास खेळीला ब्रेक लावण्यासाठी विराटने जवळपास २१ मीटर अंतर धावत येऊन अशक्यप्राय वाटणारा झेल टिपला.

ग्रीन जर्सीत विराट कोहली घरच्या मैदानात फलंदाजीत आपली छाप सोडण्यात अपयशी ठरला, पण फिल्डिंगमध्ये त्याने त्याची कसर भरून काढल्याचे दिसून आले. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुचे गोलंदाज दिल्ली कॅपिटल्सच्या संघाला धयावर धक्के देत असताना केएल राहुलने अर्धशतकी खेळी करत "कांतारा शो टू बी कंट्युन्यू..." ची झलक दाखवणारी खेळी साकारली, पण क्रुणाल पांड्याच्या गोलंदाजीवर मोठा फटका मारण्याचा त्याचा प्रयत्न फसवा ठरला. विराट कोहलीने लाँग-ऑफवरून डावीकडे धावला आणि एक्स्ट्रा-कव्हरच्या दिशेने त्याने उत्कृष्ट झेल टिपला.

धावांचा पाठलाग करताना भुवीने कमालीच्या इनस्विंगवर फॉर्ममध्ये असलेल्या पथुम निसंका याला अवघ्या एका धावेवर तंबूचा रस्ता दाखवला. त्याची जागा घेण्यासाठी मैदानात उतरलेल्या करुण नायरच्या रूपात भुवीने आपल्या खात्यात दुसरी विकेट मिळाली. फिल सॉल्टने त्याचा अप्रतिम झेल टिपल्याचे पहायला मिळाले. भुवीच्या गोलंदाजीवरच यष्टीरक्षक जितेश शर्माने सामन्याला कलाटणी देण्याची क्षमता असलेल्या समीर रिझवीचा अफलातून झेल टिपल्याचे पहायला मिळाले. त्यात कोहलीच्या सर्वोत्तम झेलची भर पडली. हा झेल पाहून स्टँडमध्ये उपस्थितीत असलेली त्याची पत्नी आणि बॉलीवूड अभिनेत्री अनुष्का शर्मानेही त्याला खास दाद दिल्याचे पहायला मिळाले.

# प्रशिक्षक नवल सिंह बडतर्फ

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



दोन वेळचा ऑलिम्पिक पदकविजेता भारताचा भालाफेकपटू नीरज चोप्रा आणि पॅरालिम्पिक सुवर्णपदक विजेता सुमित अंतिल यांच्या तक्रारीनंतर द्रोणाचार्य पुरस्कार विजेते प्रशिक्षक नवल सिंह यांना भारतीय पॅरालिम्पिक समितीने बडतर्फ केले आहे. त्यांच्यावर मानसिक छळ, शिवीगाळ आणि दारू पिऊन अपमानास्पद वागणूक दिल्याचा आरोप करण्यात आला होता.

सुमित अंतिलने भारतीय क्रीडा प्राधिकरणाकडे लेखी तक्रार दिल्यानंतर हे प्रकरण उघडकीस आले. या तक्रारीत त्याने प्रशिक्षक नवल सिंह यांच्यावर मानसिक छळ, शिवीगाळ आणि अनुचित वर्तनाचे गंभीर आरोप लावले. प्रशिक्षक अनेकदा दारूच्या नशेत खेळाडूंचा अपमान करायचे आणि त्यांच्या कुटुंबाबद्दलही अपशब्द बोलायचे, असे सुमितने म्हटले आहे. तपासात प्राथमिक पुरावे मिळाल्यानंतर प्रशिक्षक नवल सिंह यांना तत्काळ पदावरून हटविण्याचा निर्णय घेण्यात आला असून खेळाडूंच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com